म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९६९०

# शैंगार

REFBK-0014814
REFBK-0014814

०खोरकर

# गितार

बा० भ० बोरकर

मौज प्रकाशन

किंमत चार रुपये

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ४००६८ वि: काव्य
क्रमांक १६८० नों दि: २८।१।५८

# गितार

चा० भ० चोरकर

REFBK-0014814
REFBK-0014814

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८८९४
शाखा (स्थळ प्रत)

मौज प्रकाशन

मौज प्रकाशन : १२२
पहिली आवृत्ती : सप्टेंबर १९६५
© १९६५, बा० भ० बोरकर
किंमत चार रुपये

मुखपृष्ठ :
पद्मा सहस्रबुद्धे

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

आई तुझ्या नवसाने अजून मी मूल
बोललेला बोल झाला जळांतलें फूल
तुडुंबली तळी, आला चांदण्याला भार
कृपा तुझी, एकावलीं गीत आणि तार

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २००६८ वि: क/०५
क्रमांक ९६१० नों दि: २८/१२

# अनुक्रम


पहिलेवहिले सूर नऊ
चोरपावलीं दुपार १
पागल हो क्षण २
आकाशींचे रंग शुष्क ३
वाटे गेला रंग ५
तूं न निर्मम ६
ओसरला तो पूर म्हणुनि तूं ७
कुणासाठी तरी ८
माणूस मी, तूं परी ९
उदकावर खेळाव्या वाफा १०
जवळ जवळ असुन रोज ११
ती एक याद १२
तुझें पांगलेलें मन १३
वन कळकांचें पिवळें गाळी १४
भेटींतच पहिल्या १५
तूं रहा अशीच दूर १६
कळत जातें तसें १७
येतें वारें जातें वारें १८
निर्गान निःस्वप्न १९
तुझ्या दुःखा २०
नसे रोष कांही २१
संध्येची सरते अस्ताई २२
माझ्या घरीं मीच मला लुटावें २३
पर्जन्याचीं पिसें सांडलीं २४
ढवळे ढवळे ढग २५
नजरा टाळूं, उपरें बोलूं २६
रे थांब जरासा २७
इंद्रदिनाचा असर सरेना २९
प्रीतीची वाट ३१
प्रीत वहावी संथ ३४
भांडणानंतर ३५
कां वळून पाहिलेंस ? ३६
वारंवार आवर्जून मन म्हणतें ३७
फांदीसारखी झुकते सांज ३८
जवळपणांत होतों दूर ३९
सर्वसाक्षी एक पक्षी ४०
चालले हे उंट कोठे ? ४१

राग नाही, रोष नाही ४२
ऊन होउनी पसर ४३
शिशासारखी भरली ४४
विसर ४५
जेथे जातों तेथे ४६
तूंच माझा सोयरा ४७
असावें ४८
एकटेंच ४९
हळद लावुनी आलें ऊन ५०
आलीस ५१
ओसरली भरती ५२
स्मरते कधी ५३
तूं गेल्यावर ५४
हे नसोत माड तिथे ५५
दिवस गार आले रे ५६
जळणाऱ्या जळत रहा ५७
गणगोत ५८
नाही कांहीच आपुलें ५९
समुद्रराग ६०
हवा पावसाळी ६१
सूर सूर ६३
शब्द मनांत करतो कीव ६४
प्रसन्न बुद्ध ६५
शीड ६६
अभंग ६७
आंदणवेळ ६८
लाडकें श्वानसें ६९
मराठीच्या ओव्या ७१
पैगाम ७२
तुझें रूप पाहतों ७३
गिमाचा कुसवा ७४
चित्त पिपासित रे ७५
कृतार्थ ७७
माझी काया ८०
पहाट होतांच ८१
घनवदन ८३

## पहिलेवहिले सूर :

मी नेहमी कसल्यातरी स्वप्नात रंगलेला असतो. आठवणीत रमण्याचे मला सुचतच नाही. पण आज वाटले, थोडे मागे वळून पाहावे. कारण आता दस सरले आहेत आणि पाच उरले आहेत. सरलेल्या दिवसांवर नजर टाकल्यावर दिसले की तेथे काळोख्या विस्मृतीचे गर्द जंगल माजले आहे आणि त्यात जागोजाग चांदण्याचे लहानमोठे कवडसे पडले आहेत. एकाकीपणात ते न्याहाळीत बसणे बरे असते.

शब्दांचे माझे वेड अगदी लहानपणापासूनचे. लोलकांप्रमाणे मी ते खेळवीत बसायचा आणि तालासुरात घोळवीत रहायचा.

माझे दुसरे वेड होते रंगांचे. काका (माझे वडील) फुरसतीच्या वेळी खोलीच्या भिंतींवर चित्रे काढीत. त्यांचे हे चित्रकाम मी तासन्तास टक लावून बघत असे. त्यांची पाठ फिरली की फडताळातल्या त्यांच्या रंगांच्या पुड्या उघडून मी समोर मांडीत असे. तांबडा, निळा, चांदवर्खी आणि सोनवर्खी रंग मला भुरळ घालीत. त्यांना पाहतापाहता भोवतालच्या जगाचा विसर पडून मी एका अद्भुत जगात पोचायचा. त्यात अक्राळ-विक्राळ राक्षस होते. अकटोविकट भुतेखेते होती. मुकुटमंडित देवगंधर्व होते आणि

विशेष म्हणजे लाडीक आणि गोऱ्यागोमट्या पऱ्या होत्या. त्या जगातून जाग येई ती पाठीत धपाटा बसल्यावर. रंगांशी खेळण्याची माझी ती हौस पुरवली गेली नाही याची अजून मला खंत आहे.

रंगांप्रमाणेच मला स्वरांचेही वेड होते. माझे थोरले मामा पट्टीचे गाणारे होते. त्यांचा आवाज जितका गोड तितकाच पल्लेदार होता. वझेबुवांची त्यांच्यावर विशेष मर्जी होती. ते केशवराव भोसल्यांची आणि गंधर्वांची नाटकांतली पदे सहीसही उभी करीत. मला ती एकदोनदा ऐकून पाठ होत. मी ती वेळीअवेळी म्हणत राहायचा. आरंभी याचे थोडे कौतुक झाले. पण पुढे भजनाची वेळ सोडून अन्य वेळी गळयातून तान काढली तर थोबाडीत बसायची. गायला मिळे ते वडीलमाणसे पाहुण्यासमोर काही म्हणायला सांगत तेव्हा. मला गळा चांगला होता आणि पाठही फार लवकर होई. त्यामुळे आमच्या आणि चुलतकाकांघरच्या एकूण एक माणसाने आपापले पाठांतर माझ्याकडून घटवून घेतले होते. आमचा पात्रीस भंडारीदेखील आपली कोकणी गीते माझ्याकडून म्हणून घ्यायचा. घरच्या करड्या शिस्तीने गांजलेल्या माझ्या मनाला हाच एक विरंगुळा असे.

माझ्या लहानपणचे ते जग अष्टौप्रहर आणि बाराही मास कवितेने गजबजलेले असे. नागपंचमीपासून भजनी सप्ताह सुरू होई. रोज रात्री चित्रांचे पार निघत आणि दिंडीत भजनाची झुंबड उडे. "वारियानें कुंडल हाले । डोळे मोडित राधा चाले" या गाण्याबरोबर तशी राधा अक्षरशः डोळ्यांसमोर उभी राही. नवरात्रात नाटके आणि कीर्तने, शिमग्यात शिमग्यातली गाणी,—असे बारमास गावात काही ना काही चाललेले असायचे. गणेशचतुर्थीचा मोसम जवळ आला की जास्तीत जास्त आरत्या पाठ करण्याची अहमहमिका लागायची. दिवस सुरू व्हायचा तो भूपाळ्यांनी आणि संपायचा तो रात्रीच्या भजनाने. हे भजन आमच्याकडे रोज

अनुक्रम ४००६८ वि: क्र१०५
क्रमांक ९६०० नोंद दि: २८।१९६८

तीनतीन तास चाले. आमच्याकडची ही भजनी परंपरा सात पिढ्यांची होती. त्यांतली भजने, पदे अगदी निवडक होती. ती अशी रंगून म्हटली जात की "नाचतां नाचतां देवाचा गळला पितांबर" या कडव्याबरोबर देव्हाऱ्यातली मूर्ती जिवंत होऊन माझ्या डोळ्यांसमोर नाचू लागे.

चातुर्मासात घरच्या चौसोपीवर 'आर्याभारत', 'पांडवप्रताप', 'हरि-विजय', 'भक्तिविजय' अशा ग्रंथांचे वाचनविवरण चाले. पिकेच्या दिवसांत कानफाटे, वारकरी, वासुदेव असे नाना प्रकारचे लोक दारात काही ना काही गाऊन जात. सारे जग पदांकवितांनी गजबजलेले होते. स्पंजासारखा मी त्यात बुडून होतो.

आमची घरातली आणि व्यवहारातली भाषा कोकणी. त्यामुळे आरंभी, झालेल्या पाठांतराचा अर्थ नीटसा कळत नसे. पण पुढेपुढे तो आपोआपच कळत गेला आणि त्यातल्या भावभावनांनी मी हेलावून जाऊ लागलो. कधीकधी भजने म्हणताना डोळ्यातून आसवे ओघळत. एकदा मी त्यापायी मारही खाल्ला आहे. एवढासा पोरगा भजनातल्या भावाने सद्गदित होऊ शकतो हे घरच्या वडील माणसांना कसे पटावे ?

माझ्या या असाधारण भावशक्तीमुळे सुखापेक्षा दुःखच माझ्या वाट्याला जास्त आले. ज्याला त्याला मला रडवण्यात कोणते सुख वाटत होते, देव जाणे ! अशा दुःखाने मी बेजार झालो म्हणजे चंद्राशी, ढगांशी, झाडां-झुडपांशी, पाखरांफुलपाखरांशी आणि देव्हाऱ्यातल्या देवाशी बोलून जीव हलका करीत असे.

माझी आजी घरच्या गायीशी, कुत्र्यामांजरांशी, अंगणातल्या तुळशीशी आणि अवेळी ओरडणाऱ्या कावळ्याशी माणसांशी बोलल्याप्रमाणे बोलायची आणि त्यांना रागे भरायची. देवाशी तर ती तिरीमिरीवर येऊन भांडायची आणि त्याची लाज काढायची. मी तिचा लाडका होतो. तासभरदेखील मी

डोळ्यांआड होणे तिला खपत नसे. तिचे हे वागणे पाहून सृष्टीतल्या साऱ्या चराचराला आपले सुखदुःख समजते असे माझ्या मनाने घेतले असावे.

आठनऊ वर्षांचा असताना मी एकदा काकांच्या बरोबर किरिस्ताव भंडाऱ्यांच्या लग्नाला गेलो होतो. लोकांच्या आग्रहामुळे तिथल्या तिथे कटाव रचून आमच्या पात्रीस भंडाऱ्याने आपल्या शीघ्रकवित्वाचा नमुना दाखवला. हा प्रकार पाहून मी आश्चर्याने स्तंभित झालो. मनात आले, आपणही पात्रीसप्रमाणे कविता करावी.

या इच्छेचे बी एका साध्या घटनेने अकस्मात उगवले. नित्यपाठातली भजनातली पदे ठराविक क्रमाने म्हणून झाल्यावर घरातील एका मुलाने एखादे नवे पद किंवा अभंग म्हणावा, असा घरचा नित्याचा परिपाठ होता. त्या दिवशी तो म्हणण्याची पाळी माझी होती. दिवस पडला त्यावेळी अकस्मात मला या गोष्टीची आठवण झाली. भजनाची पुस्तके कपाटात बंद होती. कागद-पेन्सिल घेऊन मी घाईघाईने माडीवर गेलो. अभंग लिहून पाठ केला आणि तोच मी भजनात म्हटला. पण शेवटच्या चरणांतल्या 'बाकी म्हणे'ने आफत आणली. दाजींनी मला आपल्या खोलीत बोलावून घेतले आणि म्हटले, "संतांच्या अभंगात आपले नाव घालणे पाप आहे." मी खूप सांगून पाहिले की अभंग मी रचला आहे, पण त्यांना काही ते पटेना. शेवटी तिथल्या तिथे दुसरा अभंग लिहून मला त्यांची खात्री पटवावी लागली. दाजींना या गोष्टीचे मोठे कौतुक वाटले. ते मला आजीकडे घेऊन गेले आणि झाला प्रकार त्यांनी अभिमानाने तिला सांगितला. मला वाटले होते, तिलाही फार आनंद होईल. पण मला पोटाशी घेण्याऐवजी ती चांगलीच बिथरली. संतवाङ्मयावर तिचा फार राग होता. त्याच्याच पायी आमच्या आजोबांनी मौन घेऊन संसाराकडे पाठ केली होती आणि देवळात कीर्तनाला गेल्या ठिकाणी विहिरीत पडून त्यांना अपघाती मरण आले होते.

अनुक्रम २००६८ वि:
क्रमांक ९६१० नोंद दि: २८।११।५४

मी अभंग केल्याचें ऐकून देवाला तिने आणखी चार शिव्या मोजल्या आणि यापुढे अभंग करणार नाही असे त्याच देवापुढे माझे वचन घेतले.

अभंग करण्याची ऊर्मी मी दाबून टाकली; पण कविता केल्याशिवाय मला राहावेना. मी चोरून कविता करू लागलो आणि हाताला मिळतील ती पुस्तके वाचू लागलो. घरात पुस्तके होती ती म्हणजे ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, दासबोध, रामी रामदासांची रचना आणि लहान-मोठ्या भजनावल्या. विठोबाअण्णा, सोहिरोबा, कृष्णंभट, एकनाथ यांची त्यातली पदे अजून मला आठवतात. समजोत न समजोत, मी ती पुस्तके वारंवार वाचीत असे. सोहिरोबांच्या पदांच्या दुर्मिळ पुस्तकाची तर दाजींनी मजकडून नक्कल करून घेतली होती. घरची पुस्तके वाचून संपली तेव्हा गावच्या सावकाराघरची पुस्तके मी वाचण्यासाठी आणू लागलो. त्यात टेकाड्यांचे 'आनंदगीत' होते. त्यातल्या "असें कसें मज पिसें असे हें दिसे वसे मनिं सुलोचना" या ओळीने मला एकदोन दिवस भारून टाकले. आधुनिक कवितेशी माझी पहिली तोंडओळख करून दिली ती याच पुस्तकाने. इतके दिवस मी कविता करीत होतो ती 'वेडेंवाकुडें गाईन परी तुझा म्हणवीन' या भावनेने. दृष्टी नसलेला तो केवळ आंधळा चाळा होता. भाषा आणि छंद आपलेसे करण्याचा. पण आता आधुनिक कवितेच्या रूपलावण्याने मला आकृष्ट केले. मी अशी पुस्तके हुडकू लागलो. पण बोरीसारख्या गावात ती कुठली मिळणार?

मी अशा मनःस्थितीत असतानाच कवि काऱ्यांचे वडील निवांतपणे लेखन करायला मिळावे म्हणून आमच्या घरी येऊन राहिले. माडीवर दिवसरात्र ते आपल्या लेखनात निमग्न असत. मला त्यांच्या दिमतीला देण्यात आले होते. कधीकधी आपल्या मुलाच्या हुषारीच्या गोष्टी ते मोठ्या अभिमानाने मला सांगत. 'केरळकोकिळ'मधले आपले लेख दाखवीत.

गुरुवर्य भांडारकरांशी संस्कृत व्याकरणाविषयी आपले कोणते मतभेद आहेत तेही सांगत. त्या वयात मला त्यांतले काय कळणार? पण एवढ्या विद्वान लेखकाचा आपल्यावर लोभ आहे एवढी गोष्ट स्वतःवर खूष असण्यास मला पुरेशी होती.

पुढे आमच्याकडच्या मुक्कामात ते एकदा फार आजारी झाले आणि त्या निमित्ताने आलेल्या कान्यांशी पहिल्याच रात्री माझा स्नेह जमला. सारी रात्र आम्ही एकमेकांना आपल्या कविता म्हणून दाखविल्या. आधुनिक कवितेची जाण त्यांना त्या वयातही फार चांगली होती. त्यांच्याचकडून मी केशवसुत, बालकवि, गोविंदाग्रज, टिळक आणि विनायक यांची कविता आणली आणि वाचली तशी त्यातली बरीचशी कविता मला लगेच पाठ झाली.

पुढे शिक्षणासाठी मला धारवाडला जावे लागले. तेथे मराठी कवितेची पुस्तके वाचायला मिळेनात. हायस्कुलात शिकताना इंग्रजी कवितेची गोडी लागली. पण ती आस्थेने शिकवणारे कुणीच नव्हते. तरीदेखील 'गोल्डन ट्रेझरी' मी वाचून काढली. मला ती किती कळली होती ईश्वर जाणे! धारवाडला शिक्षणापेक्षा इतर धंदेच मी अधिक केले. त्यांतलाच एक मराठी हस्तलिखित मासिक चालवण्याचा. तेथे मराठी साहित्यसाधनेला अनुकूल वातावरण नव्हतेच. तरीदेखील माझा कवितालेखनाचा छंद चालू होता. ज्या शाळेत केशवसुत शिकवीत होते तेथेच मी शिकतो आहे ही जाणीव मात्र मनात सतत जागी असे.

कॉलेजात नाव घातले होते, पण घरच्या आर्थिक दुःस्थितीमुळे घरी परतावे लागले. वर्षभर इंग्रजी शाळेत नोकरी केली. पुढे ती सोडून घरी आलो. त्या काळांत यशवंत, गिरीश, माधव ज्यूलियन यांची मिळाली ती कविता मी वाचली. रिकामपणात कविता लिहिण्यापरता दुसरा उद्योग

नव्हता. १९३० साल उजाडले आणि महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या मडगावच्या अधिवेशनाची तयारी धूमधडाक्याने सुरू झाली. त्याच सुमारास संमेलनाचे एक आघाडीचे कार्यकर्ते आणि सिद्धहस्त लेखक भाई सरदेसाई काही कामानिमित्त आमच्या दाजींकडे आले. त्यांना कागद हवा होता काही टाचणे करण्यासाठी. खण उघडून त्यानी तो काढला तर तो निघाला माझ्या कवितेचा. ते स्वतः कवी होते. त्यांनी अगत्याने विचारपूस करून मला सलगीत घेतले. अधिवेशनाच्या वेळी माझा संग्रह प्रसिद्ध व्हावा असा आग्रह धरला. माझे मडगावला काव्यगायन घडवून आणून स्वतः फिरून छपाईपुरते पैसे गोळा केले आणि स्नेह्यांना पत्रे देऊन मला मुंबईला पाठविले. मला संग्रह छापण्याचा धीर नव्हता, पण भाईंच्यामुळे मला पंख फुटले. 'माझी आगबोट' ही कविता मी मुंबईला जाताना बोटीतच लिहिली.

मुंबईहून 'प्रतिभा' संग्रहाच्या प्रतींबरोबर मी कांजण्याही घेऊन आलो. अधिवेशनात अध्यक्षस्वागताध्यक्षांना प्रती दिल्या आणि घरी परतलो. त्यावेळी आंगले यांनी प्रकाशित केलेल्या काव्यसंग्रहांत माझ्या काही कविता घेतल्या होत्या.

त्यानंतर नोकरी शोधण्यासाठी मी मुंबईला गेलो. दोनतीन महिने 'विविधवृत्ता'च्या कचेरीत काम केले आणि मुंबईला कंटाळून गोव्याला परत आलो. पणजीत सहज आंगल्यांची गाठ पडली. आपुलकीने ते मला म्हणाले, "खांडेकर तुमच्या कवितेविषयी आस्थेने बोलले. त्यांचा तुम्हाला निरोप आहे. लिहीत राहा, पण इतक्यात काही छापू नका. छापण्यापूर्वी मला भेटा."

खांडेकरांचे नाव त्या काळात कवितेचे टीकाकार म्हणून खूपच गाजले होते. मोठमोठ्यांना त्यांनी असे आडवेतिडवे केले होते की मी त्यांची भलतीच दहशत घेतली होती. त्यांनी दाखवलेल्या आस्थेमुळे मला धन्यता

वाटली. पण त्यांना पत्र टाकून कृतज्ञता व्यक्त करण्याचा देखील धीर मला झाला नाही. मात्र मी त्यांचा आदेश अत्यंत निष्ठेने पाळला.

१९३० साली एका इंग्रजी शाळेचा शिक्षक म्हणून मी म्हापशाला गेलो. तेथेच गुंडोपंत आमोणकरांची आणि माझी मैत्री जमली. आध्यात्मिक आणि तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांचा त्यांचा व्यासंग जबरा होता. मीही तोपर्यंत रामतीर्थ, विवेकानंद, रामकृष्ण परमहंस वगैरेंचे ग्रंथ आणि टिळकांचे 'गीतारहस्य' मन लावून वाचले होते. 'इमिटेशन ऑफ ख्राइस्ट', 'प्लेन लिव्हिंग अँड हाय थिंकिंग' सारखे काही इंग्रजी ग्रंथही वाचले होते. इतर कोणत्याही विषयांपेक्षा तत्त्वज्ञानावरच आमच्या अधिक चर्चा होत. गुडोपंतांची रवींद्रनाथांवर विशेष भक्ती. इंग्रजीत प्रसिद्ध झालेले त्यांचे बहुतेक वाङ्मय मी त्यांच्याकडून आणून वाचले. त्यांच्या काव्य-संग्रहाइतकेच त्यांच्या 'साधना' आणि 'पर्सनॅलिटी' या पुस्तकांनी मला भारून टाकले. या दोन्ही पुस्तकांनी माझ्या गोंधळलेल्या मनाला स्थैर्य दिले आणि त्यांच्या काव्यसंग्रहांनी मला काव्याच्या मूर्तिशिल्पाची आणि जीवकळेची खरी जाण आणून दिली. त्याच सुमारास तांब्यांचा 'अज्ञातवासीं'नी प्रसिद्ध केलेला छोटासा संग्रह माझ्या हाती आला. तो वाचल्यावर मला चिंतामणी गवसल्याचा आनंद झाला. तेव्हापासून तांब्यांच्या कवितेने मला अक्षरशः व्यापून टाकले. तिला पुढे ठेवून मी एकलव्याच्या निष्ठेने कवितेची साधना करू लागलो. त्या काळात अंगात आल्याप्रमाणे दिवसा चारचार कवितादेखील मी लिहिल्या आहेत. बायरन, शेले, कीटस आणि टेनिसन हे त्या कालातले माझे आवडते कवी.

दुसऱ्याच वर्षी नोकरीच्या निमित्ताने मी पणजीला आलो. तत्पूर्वीच एका समारंभाच्या निमित्ताने नॉर्मल स्कूलचे रसज्ञ अध्यापक प्रो० रा० शं० नायक यांच्याशी माझा परिचय झाला होता. तो या पणजीच्या मुक्कामात

खूपच वाढला. त्यांची रसिकता अभिजात होती आणि ती जितकी सूक्ष्म तितकीच सुश्लिष्टही होती. पाश्चात्य साहित्याचा आणि विविध आधुनिक शास्त्रांचा त्यांचा व्यासंग जितका दांडगा तितकाच सखोलही होता. थोड्याच दिवसांत त्यांचे माझे जिवाभावाचे नाते जमले. आमच्या वारंवार बैठका झडू लागल्या. मी माझी प्रत्येक नवी कविता त्यांना जीव ओतून वाचून दाखवू लागलो आणि मला विस्मयात पाडील असे व्युत्पन्न भाष्य ते तिच्यावर करू लागले. कधी तिच्यातले दोष मोठ्या कुशलतेने ते माझ्या लक्षात आणून देत, तर कधी तशाच विषयावरची तत्सम फ्रेंच किंवा पोर्तुगीज कविता ते मला वाचून दाखवीत आणि समजावून सांगत. त्यांच्या या प्रेरक सहवासाच्या मोहाने त्यांच्या नॉर्मल स्कूलमध्ये मी नाव घातले. ज्यांच्याकडे शिकल्याचा नायक अभिमान वाहत त्या प्रोफेसरबाई अजून तिथे शिकवीत होत्या. विलोभनीय शैलीच्या पंडिता, लेखिका, अध्यापिका आणि वक्त्या म्हणून साऱ्या पोर्तुगीज साम्राज्यात त्यांचा लौकिक झाला होता. त्यांच्या रूपलावण्याला बौद्धिकतेची, प्रतिष्ठेची आणि चारित्र्याची असाधारण झळाळी होती. अशा या लोकोत्तर व्यक्तीचे सान्निध्य लाभावे हीही इच्छा तेथे जाण्यामागे होती.

स्कुलात मी पाऊल टाकले त्या दिवसापासूनच बाईंचे अपत्यवात्सल्य माझ्यावर ओसंडू लागले. ते जणू इतकी वर्षे माझीच वाट पाहात राहिले होते. पुढे पुढे असे त्या सांगायच्याही. माझ्या मनाचे कंगोरे कौशल्याने घासून काढून त्याला खरा घाट त्यांनीच दिला. त्यासाठी त्यांनी ज्या खस्ता खाल्ल्या आणि त्रास काढले त्याला तोड नाही. दुसऱ्याच्या मुलावरून इतका जीव आजवर कुणी ओवाळला नसेल.

त्यांचे यजमान तोलाचे वकील होते तसेच व्युत्पन्न लेखकही होते. रोज त्यांच्याकडे विद्वान मंडळीची बैठक झडे आणि तेथे साहित्य, विज्ञान,

तत्त्वज्ञान आणि कला यांचा अव्ययावत ऊहापोह होई. बाईंच्यामुळे चर्चेची पातळी फार वरची राही आणि तिच्यात आगळी रंगत भरे. त्या चर्चांनी माझ्या बुद्धीची आणि मनाची क्षितिजे वाढवली. युरोपातल्या वेगवेगळ्या साहित्यिक चळवळी, मोठमोठ्या लेखकांमधले टोले-प्रतिटोले, साहित्यसाधनेतले एकेकाचे तप, आपापल्या स्वभावामुळे आणि आदर्शापायी त्यांनी ओढवून घेतलेले प्रसंग, अशा कितीतरी गोष्टी तिथे मला ऐकायला मिळाल्या.

आपण वाचलेले प्रत्येक चांगले आणि नवे पुस्तक बाई मजकडून वाचवून घेत. त्यावर चर्चा करीत. फ्रेंच भाषेत माझी फारशी गती नव्हती. म्हणून त्यांतले निवडक लेखन पोर्तुगीजमध्ये अनुवादित करून त्या मला वाचायला देत. नायक, बाई आणि त्यांचे यजमान या तीन थोर व्यक्तींच्या मार्गदर्शनामुळे मी ह्यूगो, लामार्तिन आणि म्यूसे या फ्रेंच कवींच्या काही निवडक कविता जशा वाचल्या तशीच पुष्कळशी पोर्तुगीज कविताही वाचली. पोर्तुगीज कवींत माझ्या मनाची विशेष पकड घेतली ती ज्युंकैरू, आंतॅरु, बुकाज, कामॉइस, जुवांव द देउश् आणि काझिमीरू द आब्रेव या कवींनी. ह्या शेवटच्या कवीमुळे मी काही ब्राझीलियन कवीही वाचले. त्यांची कविता मला अधिक जवळची वाटली.

१९३२ सालापर्यंत महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे कोणतेही अधिवेशन मला पाहावयास मिळाले नव्हते. मडगावला संधी होती, पण त्याच वेळी मला ताप भरला. म्हणून १९३२ सालच्या अधिवेशनाला मी जीव टाकून कोल्हापुरला गेलो. बरोबर कारेही होते. तेथे जाण्यातले आमचे खरे आकर्षण होते तांबे. ते त्यावेळी कविसंमेलनाचे नियोजित अध्यक्ष होते.

आम्ही संमेलनाच्या कँपात उतरलो त्यावेळी तेथे माझ्या ओळखीपाळखीचे कुणीच नव्हते; पण माझ्या कवितेमुळे आणि विशेषतः काव्यगायनामुळे कितीतरी लहानमोठ्या साहित्यिकांचा स्नेह तिथल्या मुक्कामात मला

अनायासे प्राप्त झाला. कँपातल्या माझ्या काव्यगायनात मी स्वतःच्या पेक्षा तांब्यांच्याच कविता विशेष रंगून म्हणत असे. त्या ऐकून माइणकर नावाचे कुणीतरी खांडेकरांचे दूरचे मामा माझ्यावर खूपच प्रसन्न झाले. ते तांब्यांच्या ओळखीचे निघाले. माझी तांब्यांविषयीची भक्ती पाहून ते आपण होऊन मला तांब्यांच्या मुक्कामी घेऊन गेले. एरवी तिथे जाण्याचा धीर मला झाला नसता.

कविवर्यांच्या प्रत्येक लहानसहान हालचालीतून उत्साह अगदी उतू जात होता. बोलताना त्यांचे डोळे विलक्षण चमकत. चारदोन शब्दांत स्नेह लावण्याची त्यांची हातोटी अजब होती. थोडे बोलणे झाल्यावर त्यांनी मला आणि कान्यांना आपल्याकडे होणार असलेल्या रात्रीच्या काव्यगायनाच्या बैठकीला बोलावले.

रात्री वेळेच्या अर्धा तास आधीच आम्ही तांब्यांच्या मुक्कामी हजर झालो. त्यावेळी संस्कृत, उर्दू, हिंदी, इंग्रजी आणि मराठी काव्यांतले समानार्थक उतारे ते म्हणून दाखवीत होते आणि त्यावर भाष्य करीत होते. त्या वयातली त्यांची ती अद्भुत स्मरणशक्ती पाहून मी स्तिमित झालो. त्यांनी दाखविलेल्या उताऱ्यांतले आश्चर्यकारक साम्य पाहून कारे म्हणाले : "याचे कारण Great men think alike." त्यावर तांबे उद्गारले : "Go, go still deeper. Great men think alike because the truth is one." माझी खात्री होऊन चुकली, हा कविश्रेष्ठ आपल्या कवितेपेक्षा कितीतरी मोठा आहे.

ठरलेल्या वेळी काव्यगायनाची बैठक सुरू झाली. माधवराव, यशवंत, गिरीश, मायदेव, वगैरे बडी मंडळी आणि माझ्यासारखे चारदोन उगवते कवी वर्तुळ करून बसलो होतो. तांब्यांच्या उजव्याने माधवराव बसले होते आणि डाव्याने मी. तांब्यांनी प्रारंभ केला : "घट भरा शिगोशिग

भरा भरा." मग क्रमाने प्रत्येक कवी एकेक कविता म्हणत गेला आणि तसतसा 'घट' खरोखरच भरत चालला. कान्यांची कविता संपली तशी माझी पाळी आली. एवढ्या मोठ्या मंडळीत कविता म्हणण्याचा तो माझ्या आयुष्यातला पहिलाच प्रसंग होता. मी मनातून चांगलाच गडबडलो होतो. 'विरोधी भक्ति' ही कविता म्हणायला मी सुरवात केली. माझ्या स्वरातला कंप कितीतरी वाढला आहे हे मला जाणवत होते. कवितेतले "तुला चुक्वुनी रमतां स्नानीं । लुगडें चोरुनि नेसी । रे तूं निष्ठुर किति हृषिकेशी" हे कडवे म्हणून संपते न संपते तोच तांब्यांची शाबासकीची थाप माझ्या पाठीत बसली आणि ते होशमधे उद्गारले, "Madhavrao, here is a star on the horizon" आणि म्हणाले, "उद्याच्या जाहीर कविसंमेलनात यांचे काव्यगायन झालेच पाहिजे."

ती काव्यगायनाची बैठक मध्यरात्रीपर्यंत चालली; पण मी भानात नव्हतो. ज्यांच्या कवितेने मला आपल्यात पार खिरवून टाकले होते त्या कविश्रेष्ठ तांब्यांच्या या अनपेक्षित प्रशस्तीने मला ब्रह्मांड थिटे झाले होते. आनंदातिरेकाने छाती फुट्र पाहात होती. त्या एकाच रात्रीत "मी माझा मज सांपडलों" असा चमत्कार होऊन गेला.

त्या सुखाच्या तंद्रीत मी असा मस्त होतो की जाहीर कविसंमेलनात भाग घेण्याची अपूर्वाई मला राहिली नव्हती. तिथे मी माझी 'वास्तव्य' कविता म्हटली. व्यासपीठावरच्या बऱ्याचशा वरिष्ठ मंडळीने हस्तांदोलन करून माझे अभिनंदन केले. पण त्यावेळच्या आनंदाच्या नशेत माधवराव आणि गोविंदराव टेंबे यांच्याशिवाय अन्यांचे चेहरे माझ्या स्मृतीवर नीटसे उमटलेच नाहीत.

तांब्यांच्या शाबासकीमुळे तत्कालीन मान्यवर कविमंडळात माझे चांगले स्वागत झाले आणि जो-तो आस्थेवाईकपणे माझी विचारपूस करू लागला.

द्रा.क्र. १४६७४

माधवराव, यशवंतराव, गिरीश आणि मायदेव यांनी तर विशेष अगत्य दाखविले.

कोल्हापुरच्या या अनुभवाने माझ्यातला बुजरेपणा पुष्कळच कमी झाला आणि माझ्यात थोडा आत्मविश्वास आला. मराठी दोन इयत्ता आणि इंग्रजी मॅट्रिक यापलीकडे आपले शिक्षण झालेले नाही हा न्यूनगंड बरेच दिवस माझ्या मनात घर करून होता. नायक, बाई आणि त्यांचे यजमान माझ्या ठिकाणच्या प्रतिभाशक्तीविषयी मोठ्या विश्वासाने बोलत; पण त्यात सत्यापेक्षा त्यांच्या चांगुलपणाचाच भाग अधिक, असा माझा समज होऊन बसला होता. पण कोल्हापुरच्या अनुभवाने त्यांच्या म्हणण्यात बरेच तथ्य असावे असे मला वाटू लागले आणि भीड चेपून मला थोडा धीर आला. नायकांचा सल्ला घेऊन मी खांडेकरांच्या भेटीला जाण्याचे ठरवले. जाताना त्यांनी इशारा दिला, "खांडेकर तुमच्या कवितेची चहा करतील असा मला विश्वास वाटतो. पण अनुभव उलटा आला तर तुम्ही खचता कामा नये. आता आपली ताकद तुम्ही स्वतः ओळखली पाहिजे."

माझ्या पत्राला खांडेकरांचे जे उत्तर आले ते मोठे लोभसवाणे होते. तिळाएवढा स्नेह मिळाला तर तो आकाशाएवढा मोठा करून मी त्यात भराऱ्या घेतो अशी अजून माझे स्नेही माझ्यावर टीका करतात. त्यांची ही टीका खरीही असेल. पण माझ्या जीवनाला आणि काव्याला माझी ही वृत्ती फार उपकारक ठरली आहे. खांडेकरांच्या त्या पत्रामुळे स्नेहाच्या आकाशात भराऱ्या घेत आणि कसल्यातरी नव्या काव्यपंक्ती गुणगुणतच मी त्यांच्या घरात प्रवेश केला. मातीच्या घरातला त्यांचा चिमुकला संसार जितका नेटनेटका तितकाच आतिथ्यशीलही होता. घरचा माणूस फार दिवसांनी पुन्हा घरी आल्यावर व्हावे तसे तेथे माझे स्वागत झाले. माझ्या कोणत्याही सोयीत उणीव राहू नये म्हणून भाऊसाहेब तत्पर असत.

त्यातला एक प्रसंग तर अजून माझ्या डोळ्यांसमोर ताजा आहे. "गरम पाणी तयार आहे" असे सांगून ते मला उघड्या न्हाणीघराकडे घेऊन गेले. तिथल्या शिळेवर मी आंघोळीसाठी उभा राहिलो आणि त्यांच्या खांद्यावरचा टुवाल मागू लागलो. पण तो न देता, "करा तुम्ही आंघोळ" असे म्हणत ते मला बालदीतून तांब्या भरून देऊ लागले. अर्थात मी ते त्यांना करू दिले नाही. पण त्यांच्या या अकृत्रिम आतिथ्याने मी बत्ताशासारखा जागच्या जागी विरघळून गेलो.

दुपारचे जेवण झाल्यावर मी जेव्हा त्यांना माझ्या दीडशांवर कवितांचे बाड दाखवले तेव्हा "इतके दिवस मला तुम्ही कसे भेटला नाही?" अशी त्यांनी पृच्छा केली. अडीच वर्षांमागच्या त्यांच्या निरोपाची आठवण देऊन मी त्यांना म्हणालो, "'त्रिदल आणि त्याचे कांटे' हा आपला लेख वाचून मी खरोखरच आपली धास्ती घेतली होती. अशी टीका माझ्यावर झाली असती तर माझे हार्ट फेल झाले असते." त्यावर भाऊसाहेब म्हणाले, "त्यांना हार्ट नव्हते म्हणून तर त्यांनी तसल्या कविता लिहिल्या आणि त्याचमुळे हार्ट बाजूला ठेवून मला तसली टीका त्यांच्यावर लिहावी लागली."

मी गेलो होतो एका दिवसासाठी; पण भाऊसाहेबांनी मला आग्रहाने तीन दिवस ठेवून घेतले. माझ्याबरोबर माझ्या साऱ्या कविता वाचल्या, त्यांच्यावर टीकाटिप्पणी करीत त्यांची निवड केली. बरीचशी उत्तान कविता बाजूला काढली आणि पुढे "निवडलेल्या कवितांचे काय करायचे ते माझ्यावर सोपवा" असे सांगून मला निरोप दिला. भाऊसाहेबांच्या या पहिल्याच भेटीत त्यांचेमाझे जे नाते जमले ते जन्माचे ठरले. माझ्या कवितांना पाय फुटून नामवंत मासिकात त्या प्रकाशित होऊ लागल्या त्या त्यांच्याच शिफारशीमुळे. तत्पूर्वी 'नादांत गुंगसी जें' ही माझी एकच कविता 'रत्नाकर' मासिकात प्रसिद्ध होऊन आली होती. पुढे 'ज्योत्स्ने'त माझ्या

अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक १५९० नोंद दि: २८।१।५६

कविता नेमाने प्रसिद्ध होऊ लागल्या. त्यानंतर मी वेगवेगळ्या प्रकारच्या गद्य लेखनाकडे वळलो तोही खांडेकरांच्याच आग्रहामुळे आणि उत्तेजनामुळे.

पुढे मी १९३४ च्या बडोद्याच्या अधिवेशनाला गेलो तोही त्यांची तशी इच्छा होती म्हणूनच. तोपर्यंत कवितेच्या क्षेत्रात माझी बरीचशी वाटचाल झाली होती. बडोद्याला जाताना मी मुंबईला थांबलो आणि पू० वामन मंगेश दुभाषी ('ऋग्वेदी') यांचा आशीर्वाद घेण्यासाठी पार्ल्याच्या त्यांच्या घरी गेलो. त्यांचा माझ्यावर फारच लोभ होता. त्यांनी माझी चांगली सोय व्हावी म्हणून धर्माधिकारी नाडकर्ण्यांना पत्र दिले. नाडकर्ण्यांनी आपल्याचकडे माझ्या राहण्याची व्यवस्था केली. त्यांच्या दीनानाथची आणि माझी चांगली दोस्ती जमली. तो दिलरुबा फार चांगला वाजवी. तोच मला संमेलनाच्या कँपात घेऊन गेला. आम्ही ज्या दिवाणखान्यात शिरलो तेथे खांडेकर आणि माधवराव बोलत बसले होते. आम्हांला त्यांनी जवळ बसवून घेतले आणि बोलणी पुढे चालली. बडोद्याच्या कविसंमेलनाचे नियोजित अध्यक्ष माधवराव होते. ते मला म्हणाले, "या कविसंमेलनात तुम्ही भाग घेतलाच पाहिजे." बडोद्याच्या त्या कडाक्याच्या थंडीमुळे आणि प्रवासाच्या त्रासामुळे माझा घसा कसा बसला आहे ते मी त्यांना सांगितले. यावर ते म्हणाले, "घशावर कांहीतरी उपाय काढा. पण लोकांपुढे येण्याची ही संधी दवडू नका. नाहीतर तुम्हाला आणखी पंधरा वर्षे वाट पाहावी लागेल. पुढे येण्याची जागा म्हणजे पुणे किंवा बडोदे. काही घाबरू नका, मी तुम्हाला सांभाळून घेईन." माधवरावांच्या ह्या आग्रहाला खांडेकरांनीही दुजोरा दिला.

संमेलनातला अफाट जनसंमर्द पाहून मी चांगलाच गांगरलो होतो. "नाव घ्या, नाव घ्या!" असा ओरडा करून लोक भल्याभल्या कवींना व्यासपीठावर टिकू देत नव्हते. गरम भाताने गळा शेकून आणि तोंडात कंकोळ घोळवून मी प्रसंगाला तोंड द्यायला तयार झालो होतो. माधवरावांनी

मोजक्या शब्दात माझी ओळख करून दिली आणि मला व्यासपीठावर बोलावले. मी 'तेथें कर माझे जुळती' या कवितेची प्रस्तावना करू लागली. श्रोत्यांत थोडी चुळबूळ होते आहे असे दिसताच माधवरावांनी मागून कोट ओढून इशारा केला, "लागा म्हणायला." आवाजातली कसर काढण्यासाठी दिलरुबा घेऊन दीनानाथ पाठीशी उभा होताच. मी कविता म्हणायला सुरवात करताच सारी सभा चित्रवत होऊन ध्यान देऊ लागली. कविता संपताच टाळ्यांचा कडकडाट झाला आणि श्रोत्यांतून "आणखी म्हणा, आणखी म्हणा" असे आवाज उठले. दुसरी कविता मी म्हटली ती 'मुशाफिरा'. त्यानंतरही असेच आवाज उठले. पण मला आणखी कविता म्हणायला न सांगता माधवरावांनी पुढचे नाव जाहीर केले. मी थोडा नाराज झालो. पण माधवरावांनी मला योग्य वेळीच थांबवले होते. माझा आवाज दमला होता. त्यावेळी मी आणखी गायलो असतो तर मिळवलेले गमावून बसलो असतो. बरोबरच्या गोमंतकीय सोबत्यांना जेव्हा मी माझ्या काव्यगायनावरचा अभिप्राय विचारला तेव्हा ते त्यांना फारसे पसंत पडलेले दिसले नाही. शोभा व्हायची टळली एवढ्यात मी समाधान मानले.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजरत्न जोशी माझ्या मुक्कामी आले आणि म्हणाले, "पहिले सुवर्णपदक तुम्हाला मिळाले आहे. माझ्याबरोबर दुकानात चला आणि तुमच्या आवडीचा डिझाइन पसंत करा." मला वाटले, त्यांचा काहीतरी घोटाळा झाला आहे. कारण काळेल्यांचे त्या रात्रीचे काव्यगायन मला फार आवडले होते. मी तसे त्यांना सांगितले आणि म्हटले, "नीट बघा. तुमची काही चूक झाली असेल." यावर ते म्हणाले, "खरे कवि आहात. अहो, मी वकील आहे. चुकेन कसा? आणि सुवर्णपदक उत्कृष्ट कवितेसाठी आहे, काव्यगायनासाठी नव्हे."

त्याच दिवशीचा दुसरा अनुभव याच्याहीपेक्षा अधिक थक्क करणारा होता. संमेलनात मी म्हटलेल्या माझ्या दोन्ही कविता उतरवून घेण्यासाठी पू० वामन मल्हार जोशी मुद्दाम पत्ता काढून माझ्या मुक्कामी आले होते. चांगुलपणाची त्यांची ही पराकाष्ठा पाहून ओशाळून माझा जीव तिळाएवढा झाला. अवघडल्यासारखे होऊन मी तात्यांना म्हणालो, "मला निरोप पाठवला असता तर मीच नसतो का त्या घेऊन आलो?" यावर मानेला हिसका देऊन तात्या म्हणाले, "असं कसं? कवीचा योग्य आदर झालाच पाहिजे. मला त्या आमच्या शाळेतल्या मुलींकडून म्हणून घ्यायच्या आहेत."

बडोद्याच्या वारीतला मला झालेला सर्वात मोठा लाभ म्हणजे विठ्ठलराव घाटे. माझ्यावर ते असे काही फिदा झाले की माझी प्रत्येक कविता त्यांनी मला चारचारदा म्हणायाला लावली. केवढी तरी रात्र गच्चीवरच्या चांदण्यात माझे हे काव्यगायन चालले होते.

दुसरे दिवशी तेच मला कविवर्य चंद्रशेखरांकडे घेऊन गेले. आम्ही बरेच लोक होतो. प्रत्येकाने त्यांना आपापली कविता म्हणून दाखवली. त्यांनीही आपल्या एकदोन कविता म्हटल्या. मी 'इतुक्या लौकर येइं न मरणा' ही कविता म्हटली तेव्हा चंद्रशेखर सद्गदित होऊन उद्गारले, "विठ्ठलराव, पोरं फार पुढं गेली हो." कवितेच्या मोठेपणाने आजवर मी जितका भारावलो त्याहून कवीचा हा मोठेपणा पाहून अधिक भारावलो.

बडोद्याने सर्वच अर्थांनी मला मोठा केले.

बडोद्यातल्या तीन गोष्टी मी जन्मात विसरणार नाही. त्या म्हणजे माधवरावांच्या अध्यक्षीय भाषणाची ऐटबाज 'डिलिव्हरी', जनरल नानासाहेब शिंद्यांचे रुबाबदार व्यक्तिमत्त्व आणि लक्ष्मीविलास राजवाड्यातला व्हीनसचा पुतळा. या आठवणीबरोबर नानासाहेबांशी माझे जे वर्तन झाले तेही आठवले. आज त्याचे आश्चर्य वाटते.

पदके देण्याचा समारंभ त्यांच्या हस्ते व्हायचा होता. ते लष्करी शिस्तीचे गृहस्थ. त्यांना कामे चटचट उरकायची होती. मी बडोद्याला गोमंतक साहित्य सेवक मंडळाचा प्रतिनिधी म्हणून गेलो होतो. मला सुवर्णपदक बहाल करण्याच्या वेळी मी त्यांना म्हणालो, "मला माझ्या संस्थेच्या वतीने आभाराचे चार शब्द बोलायचे आहेत." नानासाहेब करडेपणाने म्हणाले, "वेळ नाही. बोलायला मिळणार नाही." मी ताडकन जबाब दिला, "तर मग माफ करा. मला सुवर्णपदक घेता येणार नाही." अर्थात अकस्मात उडालेली ही ठिणगी त्यांनी तितक्याच दिलेरपणाने विझवली आणि मला बोलू दिले. पारितोषक-वितरणाचा समारंभ संपल्यानंतर मी माधवरावांचे आभार मानण्यासाठी त्यांना भेटायला गेलो. भाऊसाहेबही तेथेच होते. ते मला म्हणाले, "अहो, तुमचे सुवर्णपदक कुठे आहे?" मी खिशातले पदक काढून त्यांच्या पुढे केले. त्यावर ते म्हणाले, "अहो, ते पोरासारखे असे खिशात काय ठेवलेत?" आणि स्वतःच्या हातांनी त्यांनी ते माझ्या कोटाला लावले. त्यावेळचे त्या उभय ज्येष्ठ साहित्यिकांच्या मुद्रेवरचे समाधान काही आगळेच होते.

त्यानंतर अडीच वर्षांच्या आतच भारतगौरव ग्रंथमालेने 'जीवन-संगीत' हा माझा कवितासंग्रह प्रसिद्ध केला. चंद्रशेखरांच्या कवितेनंतर तिने आपले पुष्प म्हणून प्रसिद्ध केलेले काव्याचे हे एवढेच पुस्तक. भाऊसाहेबांची प्रस्तावना ही मला त्यावेळी चिलखतासारखी ठरली. या पुस्तकामुळे मला अर्थप्राप्ती काही झाली नाही. पण माझ्या कवितेचे अपार कोडकौतुक झाले. कविवर्य तांब्यांनी पत्रद्वारे तोंड भरून स्तुती केली, ऋग्वेदींनी 'तेथें कर माझे जुळती' या शीर्षकाच्या आपल्या कवितेने माझे सहर्ष अभिवादन केले, काकासाहेब कालेलकरांनी माझ्या कवितेचा रसविमर्ष करीत माझे अभीष्ट चिंतिले आणि बाईनी सद्गदित होऊन मला पोटाशी धरले.

येथवर माझी कविता घडवण्यात आणि तिला स्वतःच्या पायावर उभी करण्यात माझ्यापेक्षा इतरांचाच हात अधिक होता. त्यानंतर माझ्या सुखदुःखांना सांगात करीत ती अखंड माझ्याबरोबर चालत राहिली आहे. तिला माणसांच्या स्नेहाची वाण कधीच पडली नाही. तोच आजवरचे तिचे पोषण आणि शिक्षण ठरला आहे.

आता कधीकधी थकल्यासारखे वाटते. तरीही पुढची शिखरे गाठण्याचा मोह सुटत नाही.

पणजी
५ ऑगस्ट १९६५

बा० भ० बोरकर

अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ....९५५०.... नोंद दि: २८।१५५९

# चोरपावलीं दुपार

चोरपावलीं दुपार पातली कुळागरीं
गात गोड भर्जरी स्वरांतुनी असावरी

सावल्या विसावल्या; तटस्थ जाहलीं दळें
पालवींत पाखरें शहारलीं स्वरामुळे

मंत्रिती निमंत्रणें : घरास ये सहोदरा
पादधावना तुझ्या अधीर माउली धरा

आठवूनि ते लळे जळें गळ्यांत दाटलीं
अस्तमानलीं सुखेंहि वाटलीं पहाटलीं

१९४५

## पागल हो क्षण

किती किती राहशील सावध?...मोडशील ग भाराने
उडतें छप्पर धरिलें का कधि हटेल मिटल्या दाराने?
पागल वारा, पागल धारा, खेव मांडिला पाण्याने
सावरशिल किति करिंची पणती वारेंभरल्या पदराने?
धडकन अंधारांत विजेची!...अगत्य कां ग वातींचें?
घालशील किति आवर प्राणा?—शरीर हें तर मातींचें
इथल्या रेघा पाडिति भेगा; ये उघड्यावर उघड्याने
घडी अशी ही पागल येते क्वचित कधीतरि भाग्याने
तोडुनि बंधन, पागल हो क्षण, वाग जरा अविचाराने
खुज्या जगाला खुशाल म्हणुं दे, "झपाटली हिज जाराने!"

पुणें : १९.५.५१

## आकाशींचे रंग शुष्क

आकाशींचे रंग शुष्क मी
नयनजळीं भिजवुनी पाहतों
तिखट उन्हाचे चटके मनच्या
चांदण्यांत न्हाउनी साहतों

गद्य जिण्याच्या जाळावरती
स्वरमद्याची भरितों सुरई
आल्या पेल्या चुंबुनि देतों
सोन्याची मी किनारझिलई

जुन्या वडाच्या खोडाखाली
करितों मी पाण्याशीं चाळा
काळोखीं मज कथिती भाकित
पारंब्यांतिल मिटल्या ज्वाळा

मलाहि दिसती व्यथा जगाच्या
परी परिसतों कथा निराळ्या
कसें उद्याच्या फूलपाखरां
म्हणूं किड्यांच्या ओंगळ आळ्या ?

जगीं घाण नी चिखलच सारा
म्हणो कितीही कुणी शहाणा
पदोपदीं मज कमळ घालितें
गुणगंधाचा नवा उखाणा

त्या कमळांचें माझें नातें
मी माझ्या कैफांत पाहतों
जाळांतहि या मोहळ होउन
ओठाओठावरुन वाहतों

२१·१०·५३

# वाटे गेला रंग

वाटे गेला रंग उधळुनी इथेच विश्वंभर
त्यांत न्हाउनी स्वरूप बघतो जळांत औदुंबर

तलम रेशमापरि सळसळतें गगन जांभळेंनिळें
ढगाढगांतुन भुवनवेलिचीं फुललीं भिजलीं फुलें

कमान पडकी आजच झाली इंद्राचें तोरण
कुणग्याकुणग्यामधुन सांडले गोपींचे पैंजण

जलवंतीच्या ओठावरचा लाल जाहला विडा
आश्विनकन्यांचा चमचमला पानोपानीं सडा

कुब्जेपरि कुणि झाड वाकडें खिळुनि राहिलें खडें
तसेंच घेउनि तळहातावर गंधपात्र कोरडें

निवडुंगांच्या फणाफणांवर तरारलीं माणकें
सहज गवसलें जें मज झालें इतुके दिन पारखें

दूर असूनहि दर्पणांत मज दिसला विश्वंभर
बघतां बघतां मीहि जाहलों वेडा औदुंबर

२१·१०·५३

# तूं न निर्मम

तूं न निर्मम, तूं न निष्ठुर, सोज्वळा तूं कोमला
का न ज्योती जाळणारी मुक्तिदात्री शीतला ?

ज्या न प्राप्तीं आप्तता, अप्राप्य ज्याला वेधितें
प्राक्तनाचें शस्त्र त्याला शोधितें अन् विंधितें

मी फुलीं येऊन जन्मा ज्योतिला लाचावलों
का तुझा तो दोष मी जर झेप घेतां भाजलों ?

दर्शनें होतां तुझीं पंखीं निघालीं योजनें
उल्कटाच्या संचिताचीं हीं अशीं संयोजनें !

जो जळाया जन्मला ज्योतीच त्याची मोहिनी
लाडका जो मुक्तिचा प्रीतीच त्याची दाहिनी

तूं न निर्मम, तूं न निष्ठुर, सोज्वळा तूं कोमला
तूं रहा निष्कंप; माझा भोग भोगूं दे मला

पुणें : १३·१०·६०

# ओसरला तो पूर म्हणुनि तूं

ओसरला तो पूर म्हणुनि तूं होउं नकोस विषण्ण
क्षीणपणांतच तुझ्या वाहतें अविरत त्याचें पुण्य
मुळेंची माती ढळुनी होतां गात्रां जड तारुण्य
पाणउतारें मला पावलें निष्ठुर तव कारुण्य
पानोपानीं आज पताका, कोजागरिची रात्र
फुलां-दिव्यांनी सुगंध-सोज्ज्वळ तुझेंहि अमृतपात्र
झालें अपुलें वियोग-मीलन लावण्याचें तीर्थ
त्याच पुराचें अजून घुमतें इथे मूक संगीत

मालाड-मुंबई : ८·१२·६०

## कुणासाठी तरी

कुणासाठी तरी या रे या रे मोडून फळांनी
कुणासाठी तरी झुका झुका जडून फुलांनी
कुणासाठी तरी या रे गाढ भरून सुखांनी
कुणासाठी तरी गा रे मुक्त सहस्र मुखांनी
पसरून पाळेंमुळें धरा धरित्रीचा तळ
पानोपानीं खेळवा रे तिच्या कुसव्याचें जळ
भुजाबाहूंनी कवळा स्वैर धावणारे वारे
लक्ष हिरव्या डोळ्यांत रात्रीं बिंबवा रे तारे
व्हा रे असे अलौकिक लोकीं येथल्या अश्वत्थ
कंप भोगा शाखापर्णीं मुळीं राहून तटस्थ

पुणें : १९·१२·६०

# माणुस मी, तूं परी

माणुस मी, तूं परी सुंदरी
प्रकाश पंखीं तुझ्या उज्ज्वले,
नेत्रीं माझ्या सरी

तूं न कुणाची, तूं न स्वतःची
तृष्णा तूं सौंदर्यरताची
दिशांत दिवसा निर्मुन मृगजळ
लाविसि प्राणा गरी

आणि वितळतां संध्या पानीं
स्वर साकळतां थेंबावाणी
थरथरतें तव बिंब त्यांतलें
बघतों धरूं अक्षरीं

विनिद्र व्याकुळ उत्तररात्रीं
होतां मी दुःखाचा यात्री
थकतां गात्रें, मिटतां नेत्रें
नेसि फुलांच्या घरीं

पुणें : २१·१२·६०

# उद्कावर खेळाव्या वाफा

उदकावर खेळाव्या वाफा, होड्यांच्या बदकांचा ताफा
रूप बघाया जरा झुकावा काठीं अन् फुलता कुडचाफा
कळकवनाचा हिरवा शेपा धूसर क्षितिजीं गर्द फुलावा
निळ्या गिरींतुन अन् जास्वंदी लवलवणारा तुरा खुलावा
तणाफुलावर गीत झुलावें, प्रीत पळावी होउन चानी
तिने थबकुनी वळतां मागे कंप भरावा क्षणभर पानीं
झाडीमधल्या रस्त्यावरती उघडावा किरणांचा पंखा
कुणग्यांमधल्या गंजीवरती उजळाव्या सोन्याच्या लंका

ओळखिचेंसें अनोळखी कुणि नकळत अंतर मंतरणारें
भेटावें मज वळणावरती उन्हांत दवसें मावळणारें

पुणें : ३०·१२·६०

क्रमांक ९४४० नों. दि. २८/

# जवळ जवळ असुन रोज

जवळ जवळ असुन रोज कां जपून दूर तूं ?
कां थरारल्यावरीहि चोरितेस सूर तूं ?

तार तार वाजुनी सतार आर्त बावरी
मौन दाटलें घनांत सावरी स्वरांवरी
कां सरी उसासतांहि उघडिसी न ऊर तूं ?

बिंबल्या निळ्या जळांत स्वप्नराजि लाजऱ्या
सांजसावल्यांत गाढ चांदफेनमंजिऱ्या
कां न आणिसी टिपूर चांदण्यास पूर तूं ?

जागवून यौवनास आग लाविली वना
नाग चेतवून कां ग डंखिलेंस चंदना ?
हसुन मधुर कां निठूर प्राक्तना फितूर तूं ?

बघत वन्हि चांदण्यांत, सांत्वनेंत यातना
स्वगत गात, आर्जवीत कामनेंत प्रार्थना
राहशील गे किती युगें अशी सबूर तूं ?

पुणें : २१·२·६१

## ती एक याद

सळसळ लाटा क्षाळिति काठा, वाळूवरही फेनतुरे
साद नसो पडसाद नसो : ती एक याद पण आज पुरे

अशीच होती धुंद वेळ ती : गंधकोवळी सांद्र हवा
गडाजवळच्या वडाआडुनी होता उगवत चंद्र नवा
पुढे विचंचळ होतें पाणी, अंचळही तव जवळ तसा
उरिंचा वाळा उसवत आला वासंतिक स्मरमोहरसा
छंदतराणा घुमला पोटीं, ओठीं अमृत तटतटलें
निकट ओढुनी जरा तुला मी गीत लाडकें म्हण म्हटलें
ग्रंथ लावुनी उभय उरोजां सभय बाजुला सरलिस तूं
रुसलिस अन् पण चिडतां मी गे त्या वळणावर अडलिस तूं
बघत भोवती भेदरल्यागत कधी मजकडे कधी नभीं
अवचित ओठीं टिपुन घेतलिस धुक्यांतली मम पुसट छबी
धुकेंच झालें अवतीभवती : त्यांत चांदणें विरघळलें
ग्रंथासह कधि मावळलिस तूं अजून तें मज नच कळलें

आजहि तरतें क्षण-अत्तर तें चंद्रबिंबही जळिं उतरे
साद नसो पडसाद नसो : ती एक याद पण आज पुरे

मुंबई : २२·३·६१

## तुझें पांगलेलें मन

तुझें पांगलेलें मन सांग सांग कसें बांधूं ?
माझें भंगलेलें मन सांग सांग कसें सांधूं ?
आलें गगन भरून तसें मन आसवांनी
तुझ्यासाठी परी अडे असें पापण्यांत पाणी
पक्षी भाळला आभाळा : वाट मागची विसरे
मौन तुझें तीरसें गे मात्र काळजांत शिरे
सांग सांग कशी तुला पुन्हा बोलकी गे करूं ?
कसें पिसावलें चित्त आता मुठींत आवरूं ?

पुणें : १५·५·६१

## बन कळकांचें पिवळें गाळी

बन कळकांचें पिवळें गाळी पिकलीं सुकलीं पानें
खचल्या काठीं काळवंडुनी थकून पडलें गाणें
चुकला पक्षी अंधुक वेळीं शोधित फिरतो घरटें
हाक निरुत्तर...आधाराचें झाडच झालें उलटें
अनोळखी आकाश मख्ख अन् धरती दुर्मुखलेली
कण्हे दिशांच्या भिंतींमध्ये तीनसांज चिणलेली

पुणें : १५.५.६१

## भेटींतच पहिल्या

भेटींतच पहिल्या तूं मज कथिलें होतें
तव प्रथम प्रेम जें तुलाच कळलें नव्हतें
त्या शोककथेंतिल व्यथा झिरपली जेव्हा
तेव्हाच प्रेम हें अपुलें रुजलें होतें

पुणें : १६·५·६१

# तूं रहा अशीच दूर

तूं रहा अशीच दूर; मी भरून ऊर
एकलाच आळवीन जो दिलास सूर

लौकिकांतल्या सुखीं सुनें, उदास वाटतां
आणि आसवें उगीच पापण्यांत दाटतां
मी असेन जेधवां मलाच शोधण्यांत चूर
एकलाच आळवीन जो दिलास सूर

आटतां तळीं, झरे, घळींत पेटतां झळा
पोळुनी उसासतां मुकाट माळ मोकळा
जीव जेधवां भ्रमेल भ्रांत होउनी चतूर
एकलाच आळवीन जो दिलास सूर

दीस जेधवां पडेल पालथा जसा घडा
पिंपळापलीकडून अन् झडेल चौघडा
जांभळ्या घरांवरून कोवळा चढेल धूर
एकलाच आळवीन जो दिलास सूर

पुणें : २२·५·६१

# कळत जातें तसें

कळत जातें तसें कशीं जवळचींही होतात दूर ?
जुने शब्द सुने होऊन वाजतात कसे बद्द निसूर ?
कळत जातें तसें कसें ऊन पाण्यांत खिरून जातें ?
वाकुड-सावल्यांत वाट चुकून चांदणें कसें झुरून जातें ?
कळत जातें तसें कशा मूर्ती साऱ्या झिजून जातात ?
पापण्यांमधले स्नेह थिजून ज्योती कशा विझून जातात ?
कळत जातें तसें कशीं झाडें-पाखरें जीव लावतात ?
शब्द सारे मिटून कसे तळ्यांमधेच पेंगूं लागतात ?
कळत जातें तसें कशा दूरच्या घंटा ऐकूं येतात ?
दूरचे रंग, दूरचे गंध प्राण कसा वेधून घेतात ?
कळत जातें तसें कां रे एकटा एकटा होतो जीव ?
रागरोष सरून कशी आपलीच आपणां येते कीव ?

पुणें : २४·५·६१

# येतें वारें जातें वारें

येतें वारें, जातें वारें : पान पान गळतें आहे
आला पूर, गेला पूर, पाळ पाळ ढळतें आहे
निळा मेघ सोनरेघ, वर्ख थोडा झडतो आहे
टाचाघाशी प्रकाशाचा घोडा जरा अडतो आहे
सुकें रुखें मुकें झाड जराशाने पडणार आहे
उजळीत घाट, धवळीत काठ, वरची वाट चढणार आहे

पुणें : २५.५.६१

# निर्गान निःस्वप्न

निर्गान निःस्वप्न निदीप सारें
अंधार घोटून मुकाट वारें
धाराविखारांत भिजून कोणी
झाडी पिसें पंख उगी बिचारें

वेडी नदी वेगतुडुंब वाहे
भूमींतली आग हवेंत आहे
कां पाखरू घोर अशा अवेळीं
चाहूल घेऊन मलाच पाहे ?

पुणें : २५.५.६१

## तुझ्या दुःखा

तुझ्या दुःखा वाणी आहे;
माझें मात्र दुःख मुकें
तुझ्या उरीं ज्वाला तरी
माझ्यांत फक्त धूर-धुकें

सराव तुला : पुलावरून
भरल्या पुरांत घेतलीस झेप
घाबरे माझे पाण्यांत प्राण :
भोवली अशी पहिलीच खेप

भोवऱ्यांच्या या बंडाळींत
तूंच आता दे रे हात
तडीपार झाल्यें तर
दिली तशीच देईन साथ

पुणें : २५·५·६१

## नसे रोष कांही

नसे रोष कांही. तुझा दोष नाही
असे सक्त ही प्राक्तनाची तऱ्हा
मला तोडतांना तुझे हाल झाले
तयाची न का जाण या अंतरा?

दुज्यांचें दुणें दुःख भोगावयाचें
मिळे भाग्य ज्यां या खुज्यांच्या जगीं
तयां ये अशी वानगी चाखल्याने
खऱ्या जीवनाची नवी ताजगी

थिट्या जीवनाचा पुरा वीट याया
असा शाप केव्हाहि वाटे बरा
अनायास जो पाश तोडीत जातो
वराहून तो मोक्षदायी खरा

वृथा बोल लावूं नको गे स्वताला
व्यथेचा पुरा ठाव घेई जरा
चिऱ्याखालुनी अमृताचा स्वयंभू
कृपाळूपणें एक वाहे झरा

पुणें : २५.५.६१

 

## संध्येची सरते अस्ताई

जलदलोचनीं खिरतो सुर्मा
संध्येची सरते अस्ताई
पारावारांतिल पंखांना
अंतऱ्यांतली झाली घाई

उरलासुरला प्रकाश आता
पळतो आहे होउनि पारा
अंधाराची पहिली तारा
निघेल धुंदावुन अभिसारा

भिऊं नको गऽ...नाही कांही
सांगायचें, मागायाचें:
दिवसभऱ्याचें दुरावलेपण
आहे केवळ लंघायाचें

पुणें : २५.५.६१

## माझ्या घरीं मीच मला लुटावें

माझ्या घरीं मीच मला लुटावें
तशी करंटी स्थिति या जिण्याची
सारें जरी लोकरितीप्रमाणे
उरीं तरी खंत चरे उण्याची

जेथे जडे जीव तिथे न थारा
सभोवती व्यर्थ रिता पसारा
वारा पुसे, "कोण तुझ्या व्यथेने
असे इथे सांग उसासणारा ?"

सोपें दिवे मालवणें : परी त्या
जबाब देणें न मुळीच सोपें
तो हासतां भ्याडपणास माझ्या
जळून जातात समूळ रोपें

पुणें : ३१·५·६१

# पर्जन्याचीं पिसें सांडलीं

पर्जन्याचीं पिसें सांडलीं
पिसावलेल्या उन्हांत
तुझें नि माझें लग्न लागलें
विसावलेल्या मनांत
क्षणांत झुलल्या मंगलाक्षता
पाना-सुमना-तृणांत
रत्नांच्या गहिवरांत न कळे
कोण हरवलें कुणांत

पुणें : १०-६-६१

## ढवळे ढवळे ढग

ढवळे ढवळे ढग खवल्यांचे निळींत वळती इवले इवले
सरीं ओवल्यागत ओघळती हरळीवरती निळसर बगळे
तृणांत हासूं, फुलांत आसूं, घराघरावर तृप्त उसासे
खिल्लारावर लव भोवरते चाऱ्यांतील मधूच्या वासें
शांति शिरशिरे पानोपानीं, गार मोकळा येथे वारा
सोनकवडसे माळुनि छाया सकाळच्या आल्या अभिसारा
गांव इथे बघ सजे उन्हाने सजणाघरच्या नांवासाठीं
उंचावरुनी झुके जरासें निळ्या तळ्याच्या पारज-काठीं

पुणें : ११·६·६१

# नजरा टाळूं, उपरें बोलूं

नजरा टाळूं, उपरें बोलूं, खरे न भेटूं पुन्हा
प्राण पेटल्यावरिहि भेटलों हाच जाहला गुन्हा
चितारलेला नाग चुन्याचा अवचित काढी फणा
तसा जिवावर उठे असावध अपुला चांगुलपणा
विसर ढका जो चुकुनि लागला अढळ तुझ्या कुंपणा
क्षमा करीं जर क्वचित संयमीं क्षणभर पडलों उणा
जन्माचा मी सुना प्रवासी घोर वाहतों दुणा
स्नेह वर्जितां अचुक चुकावें स्वभाव माझा जुना
पुन्हा न याया कालच गेला पुसून खाणाखुणा
तुझ्या प्रीतिच्या पडवीवरचा दो घडिचा पाहुणा

पुणें : १४·६·६१

## रे थांब जरासा

रे थांब जरासा
वळुनि जरा बघ, नीघ तुझ्या मग अटळ अनंत प्रवासा

शून्य वाट अन् नयनकाठ रे
अधिक आवळी चिवट गाठ रे
ताट पुजेचें पडलें अवचित, धुपतो मात्र उसासा
रे थांब जरासा

खोटें मीठें श्यामघनासम
गुन्हा श्रावणांतल्या उन्हासम
भूलहि मृदु मृगजलज फुलासम, जीव सुखांतहि प्यासा
रे थांब जरासा

माझ्या घरच्या पाहुण-सजणा
ढळ गेला रे अढळ कुंपणा
घरींच कोणी बनुनि पाहुणी आसुसली वनवासा
रे थांब जरासा

थांब मुशाफिर, वळख व्यथा रे
मुक्या चितेची जाण कथा रे
बसली ती सामान बांधुनी घेत तुझा कानोसा
रे थांब जरासा

तूं दिवसाचा सांज-कवडसा
कसा धरावा तुझा भरवसा ?
पुढच्या काळोखांत उद्याचा दे हासून दिलासा
रे थांब जरासा

पुणें : १९·६·६१

# इंद्रदिनांचा असर सरेना

इंद्रदिनांचा असर सरेना
विसरूं म्हणतां विसरेना
चंद्रमदिर जरि सरल्या घडि त्या
स्वप्नांची लय उतरेना

त्या पहिल्या कापूर-दुपारीं
झाडें झालीं उजवाती
सुरवातीची वाट चालतां
घडल्या अंतिम रुजवाती
फुलपंखांचीं निळीं पिसोळीं
भिडलीं माझ्या अधराला
फडफडुनी क्षण मुकाट जडलीं
तुझ्या हिन्याच्या पदराला
करांत कर गुंतला; अबोली
थरथरली पण विखरेना
क्षण ठरला तो व्रण हृदयीं पण
रंगांची लय उतरेना
विसरूं म्हणतां विसरेना

तरुशिखरें अन् घुमट उजळतां
सांध्य सनइच्या प्रहराला
कोळिष्टकही कनकजळाने
भिजुनी येतां बहराला
अबिरगुलालबुक्याच्या घडिला

झडतां सर मम कवनाची
शर रुतल्यागत सय आली तुज
सासरच्या जलभरणाची
कचचंपक गेलीस फेकुनी
दळ त्याचें पण उघडेना
दवांत भिजतें जरी अहर्निश
गंधाची लय उतरेना
विसरूं म्हणतां विसरेना

व्यथा-कथा बोललों किती गऽ
चांदण्यांतल्या अपरात्रीं
पूल फुलांचा झुला होइतों
बघत एकटक जळपात्रीं
होउन खंती वदलिस अंतीं :
"नकळत आंतुन ढळलें मी
सावरुं दे मज, दूर जा कसा
ऋण फेडिन पुढल्या जन्मीं."
जखम गाळितो म्लान चंद्रमा
क्षितिजावरुनी निसरेना
थारोळें जरि उरीं दाटलें
रुधिराची लय उतरेना
विसरूं म्हणतां विसरेना

पुणें : ३०·६·६१

# प्रीतीची वाट

प्रीतीची वाट नेहमीच जात असते अथांग जळांतून
वाळूवरच्या पावलांनी तिचा माग लागत नसतो
मागे उरते केवळ आगीची पोळणारी धग
पण ती आग खरी रहाते जळांतच, भिजल्याशिवाय

इथल्या सुकतीभरतीला पंचांग नाही
दिशाच वादळांत सापडलेल्या असतात
आणि लाटांच्या झिंज्या धरीत गटंगळ्या खात असतात
शास्त्रांचे नकाशे आणि गतीचीं होकायंत्रें

इथेहि पाण्यांत पडल्याशिवाय पोहतां येत नाही
अंगावरच्या वस्त्राचाहि प्रसंगीं गळफास होतो
बेहिशेबी असतो त्याचाच ताळा जमतो
हिशेबाने कुणीच हें पाणी तरला नाही :
तो आपला काठावरून त्याचा खेळ पहात असतो
बुडणाऱ्याला हसत असतो
पण जीव नेहमीं मुठींत धरून
मात्र मध्यरात्रीं
त्याच पाण्याच्या आठवणीने तोच अंथरुणावर झुरत असतो
कारण प्रत्येकाच्या रक्तांत थोडेंफार हेंच पाणी खेळत असतें
तरीहि त्याचे पाय भूमीला खिळून असतात
अशांच्या कपाळीं सीमाच काय ती लिहिली आहे
या सीमेमुळेच सम्राटाची सहचरीदेखील

बेगुमानपणें पोहणाऱ्या गुलामाच्या गळ्यांत पडते
कुरतडणाऱ्या सुखांच्या तुरुंगांतून सुटण्यासाठी

ज्याने एकदा केव्हातरी या पाण्यांत स्वतःला झोकलेलें असतें
त्याचे डोळेच त्या पाण्याची कथा सांगत असतात
त्या डोळ्यांतलें पाणी चांदण्यासारखें हसत असतें
तेजाबाचे वाफारे उधळीत
भूमीवरचें पापपुण्य त्याच्या दाहांत टिकत नाही
ज्यांच्याज्यांच्यावर तें उसळतें त्यांचें त्यांचें लोकसंचित भस्म पावतें
आणि उरतें फक्त पाण्यासारखेंच निर्मल, निरंजन, अनादि व्यक्तित्व
जें केवळ त्याच पाण्याचें घडलें आहे
आणि मग पाणी पाण्याकडे धाव घेतें
सहज, लीलेने, सोत्साह, निर्भय

पापपुण्य जळत असतांना हेंच पाणी गात असतें
आदम-इव्हेपासूनच्या सर्व प्रीतिप्रवाश्यांचीं
ध्यासाभासांचीं समुद्रगाणीं
जीं ऐकतां ऐकतां
आपण लाटांशीं खेळूं लागतों
समुद्रांतली आग घेऊन एकमेकांवर फेकूं लागतों
खेळतां खेळतां पाण्यावरच एक वाट तयार होते
भूमीवरच्या शापिताला निमिषमात्र दिसून जाते
मग त्यालाहि वेड लागतें

बरळेल त्याचें गाणें होतें
गाणें पुरतें कळत नाहीं
घुमल्याशिवाय रहावत नाहीं
घुमतां घुमतां आपण नेमके
पोचतों त्या पाण्याच्या काठापर्यंत.
...इथेच पावलें बिचकत असतात...
इथेच वाट सुरू होते...
पाण्यांतून क्षितिजाकडे...

या पाण्याला तळ नाही अन् वाटेलाहि अंत नाही.

पुणें : १०·७·६१

# प्रीत वहावी संथ

"प्रीत वहावी संथ, ध्वनीविण या तटिनीसारखी
नकळत बहरावी या हिरव्या तृणसटिनीसारखी
स्पर्शकुशल झुळुकेसम असुनी कधि न दिसावी कुणा
तिला असावा या घंटेचा सूचक शीतळपणा
तिने फिरावें या खारीसम सहजपणें सावध
ऊनसावलीमधून चुकवित डोळ्यांची पारध."

मी न मानिलें पथ्य तुझें हें: आता झुरतों उरीं
पुरुष उताविळ असाच चुकतो पहिल्या वळणावरी

मुंबई : ९.९.६१

## भांडणानंतर

झडीनंतरच्या मोतिया उन्हांत
संगमरवरी शिखर जसें
तुझ्या त्या कोवळ्या शीतळ स्मिताने
शेवटीं अंतर झालें ग तसें

गडाड ढगांचें कडाड विजांचें
भांडण एकदा हवेंच होतें
मनांचा सामना झडून प्राणांचें
मीलनदेखील नवेंच होतें

भांडण झाल्याने तुझ्या ग रूपाचें
चांदणें ओल्याने मखरीं आलें
आंत तें झुलतां माझेंही मानस
मोतिया उन्हींचें शिखर झालें

२१-९-६१

## कां वळून पाहिलेंस

कां वळून पाहिलेंस सावळ्या घडींत त्या ?
थांबलीस कां खिळून आंधळ्या झडींत त्या ?
कां दिशांत फाकिलेस रंग जांभळे-निळे ?
वेळिलेंस कां तशांत अंग सोनकोवळें ?
कां बुजून लाजलीस भेटतांच लोचनें ?
कां जडावल्या ढगांत झाकिलेंस चांदणें ?
धीट बोलणें कसें तुला न वाटला गुन्हा ?
कां विचारिलेंस तूंच, "भेटणार ना पुन्हा ?"
माळल्या सरांतलींच कां दिलींस ओवळें ?
भारिले तरू कशास गर्द गार मोहळें ?
काय जाळ लावण्यास, गाळण्या असा मधू
जाहलीस का रसाळ गोरजांतली वधू ?

मुंबई : १·१०·६१

## वारंवार आवर्जून मन म्हणतें

वारंवार आवर्जून मन म्हणतें हट्ट धरून,
"तेंच प्रेम करतेस अजून ऊर भरून, जीव भरून"
पण बुद्धी निर्दय, दक्ष, लक्ष साक्षी पुढे करून
म्हणते, "वेड्या, डोळे उघड; भ्रम नेहमी सुंदर दुरून."

सत्य थंड जड शिळा...तिचा घेतों आधार धीर
अकस्मात् अशी वागतेस!...तिलादेखील जाते चीर
नाही काय काजळकाळी कालच रेशमी अवस लेऊन
विजेसारखी येऊन गेलीस हिरवें सोनें हातीं देऊन?

तट पाण्यांत खचून खिरून थोपटली मी तुझी पाठ
एकटाच हिंडलों अहोरात्र आठवणींचा हिरवा काठ
तरी आज म्हणालीसच, "विस्कटला कां तुमचा रंग?
राग? विकल्प? की हा खोल अकल्पित अपेक्षाभंग?"

झोंबून तुझा जखमी सूर असा जळून आला ऊर
कळलें, खऱ्या दुःखापासून सुख नसतें फारसें दूर
तरी बोललों, "पहिला पूर असा वाया गेल्यानंतर
उघडा गाळ बघून वाटतें, आता पडलें केवढें अंतर!"

तेंच प्रेम करतेस अजून ऊर भरून, जीव भरून
म्हणून पूर सरूनदेखील वहातों अजून तग धरून

२०·१०·६१

# फांदीसारखी झुकते सांज

फांदीसारखी झुकते सांज, जांभळांसारखे पिकती ढग
हवेंत गारवा जड होऊन पेंगुळपांगुळ होतें जग
गगनभरल्या आठवणींचे गर्द झाडींत शिरती थवे
ओला काळोख आळत येतो उकल्याझाकल्या काजव्यांसवें
अशा वेळीं दूरचा दिवा जवळ येतो पाण्यावरून
वारा तारा छेडीत घुमतो उदास उदास सूर भरून
डोळ्यांमधे जमतें पाणी : कशासाठी कळत नाही
ऊरभरल्या उसाशाला कुठेच वाट मिळत नाही

२१·१०·६१

क्रमांक ........ नोंद दि. ........

## जवळपणांत होतों दूर

जवळपणांत होतों दूर, आता दुरून झालों जवळ
म्हणूं नकोस, जाणूनबुजून मीच माया केली पातळ
...तशी आठवण येत नाही, भेटीचीहि काय जरूर ?
सूर वाहे ऊर भरून, घरांतदेखील चांदणें टिपूर
इतके दिवस हसतरुसत वाटलें सृष्टींत नटली आहेस
आता कळतें, खोल खोल माझ्याच दृष्टींत मिटली आहेस
गंध होऊन हुलकावण्यांनी अवतीभवतीं राहिलीस खेळत
आता माझ्यांत श्वास होऊन वहात असतेस सहज नकळत
कधी कामांत, कधी गाण्यांत फुलतांफळतां भानांत नसतों
तुला विसरून अष्टौप्रहर...अष्टौप्रहर तुझ्यांत असतों
आता तारे पिकत चालले, आकाश झालें निरभ्र निवळ
दुरून जवळ झालों तसें क्षितिजदेखील आलें जवळ

१·११·६१

# सर्वसाक्षी एक पक्षी

सर्वसाक्षी एक पक्षी मध्यरात्रीं फेर घेतो
नागिणी विद्युल्लतेला चोचिने सर्वत्र नेतो
धावत्या पंखांतुनी तो सोडितो सोसाट वारे
अंतराळीं सांडितो डोळ्यांतुनी तेजाळ तारे
झुंजत्या ऐरावतांचें युग्म नेतो पावलांनी
माव त्याची ही अशी ये योगियांच्याही न ध्यानीं
वेढितां त्याने दिगंता रे कढे अंधार सारा
आंधळ्या प्राणीं जडाच्या पाजळे वेगें निखारा
उद्भिजां तो जाग देतो, ऋत्विजांना आग देतो
गाडल्या तृष्णाक्षुधांचा पाळतीने माग घेतो
पोळितो आशा-अपेक्षा आळसाने आळलेल्या
जाळितो गंजी सुखांच्या वासनेने वाळलेल्या
संस्कृतीने कोंडलेले पेटवी सारे उसासे
नी तुरुंगांचे-घरांचे वेढणारे खांब-वासे
गांजल्यांच्या स्वाभिमाना अग्निचें तो वेड देतो
दालकांच्या छत्रदंडा नेत्रपातें छेद देतो
मागतो त्या सागराचा क्षोभ देतो, वेग देतो
जागत्याच्या प्राक्तनाला तारकांची रेघ देतो
पेटले आहेत माथीं तारणारे लक्ष तारे
हाय ! कैसे याच वेळीं झोपले आहेत सारे !

१७·११·६१

# चालले हे उंट कोठे?

चालले हे उंट कोठे तप्त रेताडांतुनी?
स्वार झाल्या प्रेषितांना कोण हाकी कोठुनी?
कां निघाले टाकुनी हे बायकापोरें, घरें
ना जरी वाटेंत कोठे पान, पाणी, पाखरें?

पाणियाला पाठमोरी कोणती यांची तृषा?
आणि डोळे बांधणारी कोणती यांची दिशा?

१९·११·६१

## राग नाही, रोष नाही

राग नाही, रोष नाही, खोल थोडा आहे विषाद
या देहाची मातीच अशी!...प्रेमासंगें जमतो प्रमाद
पाण्याखाली गाळ जसा, ज्योतीखाली छाया जशी
प्रीतीलाही वेढून असते आसक्तीची माया तशी
पण असा अकस्मात् आपलाच आपणां लागतां तळ
वरची ज्योत उजळ होऊन खालचें पाणी होतें निवळ
कळलें मोकळ्या हवेंत उन्हांत फुलासारखा फुलतो प्राण
मूळचा मळ गिळतांगिळतांच आंतून निर्मळ मिळतें त्राण
वाऱ्या-उन्हासारख्या तुला मोकळ्या आहेत दाही दिशा
मुक्तीसाठीच जखमी उरांत फुलत असतात उषा-निशा
वाटल्यास खरेंच विसर मला...पण सतत फुलत रहा
व्यथा माझी स्मरलीच तर...तिच्यांत नवें क्षितिज पहा
करूं नकोस खंत असा माझ्यांत उरला म्हणून विषाद
पूजा खरी असेल तर त्याचादेखील होईल प्रसाद

२२·११·६१

# ऊन होउनी पसर

ऊन होउनी पसर जगावर
हिरमुसलें तृणपान फुलूं दे
थव्यास मुकलें फूलपाखरू
चुकलेपण आपुलें भुलूं दे

दव जें जमलें नयनीं माझ्या
जिथल्या तेथें तें उजळूं दे
त्यांत गवसलें मन हें माझें
विकासत्या गगनीं वितळूं दे

वारें होउनि विहर जगावर
दडलाअडला गंध उलूं दे
ज्याला त्याला अपुल्यामधल्या
गूढ सुखाचा थांग कळूं दे

१·१२·६१

# शिशासारखी भरली

शिशासारखी भरली मळभट
मृत्यूची चाहूल सुरूंना
अवचित हबकुनि थबके वारा
वाळूंतुन पाऊल सुटेना

घळीघळींतुन अडेआदळे
उजेड वेडा दिसांधळासा
मुकी जखम झाल्या हृदयाचा
तटून आहे एक उसासा

जिथल्या तेथे पंख मिटुनियां
निमूट सारीं घरेंपाखरें
राख माखुनी पडून आहे
ळ्तलागलें सुणें बिचारें

त्रिशूळसा अन् कुणी कावळा
अवकाशाला कापित येतो
जातां जातां या जखमेचा
झटकन् लचका तोडुन नेतो

८·४·६२

# विसर

मन वाहत्या पाण्याचें : पालापाचोळा ठरेना
घोर घावाचीहि रेघ चार पळेंहि टिकेना
दुःख वितळे उन्हांत, सुख भिजे चांदण्यांत
प्रेम गारवा होऊन दरवळे वागण्यांत
उरीं भेटल्याची कोठे तळीं साखर पाझरे
जातों तेथे भोवताली मला मातून मोहरे

येते उदासता कधी ओल्या काळोखासारखी
मध्यरात्रीं तिची पण फुले नक्षत्रपालखी

म्हापसें : १८·८·६२

## जेथे जातों तेथे

जेथे जातों तेथे मी माझा सांगाती
पुढे आणि पाठीं मीच माझ्या
मीच माझी वाट, मीच माझा दिवा
हिऱ्याचा ताजवा मीच माझा
मीच माझीं रूपें पाहतों पाण्यांत
आणितों गाण्यांत मीच त्यांना
मीच मला कधी हासडितों शिव्या
कधी गातों ओव्या मीच मला
अशी माझी नित्य चाले ममपूजा
लोकीं माझ्या ध्वजा मिरवितों

नाही कधी केली तुझी आठवण
म्हणालास पण "मीच तूं रे."

पणजी : १२·८·६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्र
अनुक्रम ४००६८ विः ७१।०५
क्रमांक १६९० नों दि: २०।१५

## तूंच माझा सोयरा

तूंच माझा सोयरा रे, तूंच माझा धायरा
तूंच माझे पंख तैसा तूंच माझा पिंजरा
तूंच माझा गूढ चारा, चांदण्याचा मेघ तूं
आंधळ्या माझ्या जिण्याला रेखणारी रेघ तूं
तूंच माझी गीतवाणी, तूंच माझी रे गती
अन् विसावा तूंच माझा, तूंच माझी शाश्वती
पिंजऱ्याचें दारही तूं, तूंच मुक्तीची घटी
तूंच माझा जीवघेणा बाण हो रे शेवटीं

पणजी : १३·८·६२

## असावें

उन्हासारखा हर्ष माझा असावा
घरांतून बाहेर यावीं मुलें
नभासारखा शोक माझा असावा
तृणांतून देखील यावीं फुलें

जळासारखी तृप्ति माझी असावी
स्त्रियांनी कडेचे भरावे घडे
स्वरासारखी धुंद माझी असावी
फुलावे भविष्यांतले केवडे

भुईसारखी प्रीति माझी असावी
खणी त्याजलाही फुटावे झरे
निशेसारखी शांति माझी असावी
कुशीला विसाव्यास यावीं घरें

तरीही नसावें असोनी जगीं या
निरालंब छांदिष्ट वाऱ्यापरी
कळावें न कोणा कसा पार झालों
भुलावून लोकांस पाऱ्यापरी

पणजी : १३·८·६२

## एकटेंच

एकटेंच यायचें नि एकटेंच जायचें
भेटतां मधे कुणी जरा कुठे बसायचें
बोलतां भुलायचें, पुढे उरीं झुरायचें
आणि स्वप्न कुस्करीत एकटें फिरायचें

जाणतों घडीस या तुलाहि हेंच वाटतें
आणि नाकळे कसें उगीच चित्त दाटतें

पणजी : १५·८·६२

# हळद लावुनी आलें ऊन

हळद लावुनी आलें ऊन, कुंकुमाक्षता फुलांमधून
झाडांमधुनी झडे चौघडा, घुमतें पाणी लागुन धून
नाचुन मिटली श्रावणधार, शीतळ पाऱ्यापरिस दुपार
निळींतुनी हिरव्यांत भुरळलीं पिवळीं सोनपिसोळीं चार
उभार साळी भरून दूध, हवेंत सजणी कापुरऊद
शेरवडाच्या ढवळ्या पानीं उधळे ऋतुचें लक्ष बिरूद
लावण्याचा लागुन बाण तृप्तीलाही फुटे तहान
मला खोवुं दे तुझ्या कुंतलीं एकच यांतिल पान लहान

म्हापसें : २४·८·६२

## आलीस

निशा होउनी आलिस, पण तूं उघडुनि गेलिस उषा
नव्या झळाळीमधें उमलल्या सगळ्या माझ्या दिशा

मौन घेउनी आलिस, पण तूं दिलींस गीतें नवीं
वठल्या माझ्या तरूस फुटली वासंतिक पालवी
श्वास रोधुनी थांबलीस, पण सुवास भरिला वनीं
कळ्याफुलांची पहाट झाली काव्याकाव्यांतुनी

गेलिस म्हणुनी रुसूंझुरूं कां आलिस हें का उणें ?
रात्र निमाली म्हणुनि उरांतिल सरतें का चांदणें ?

पणजी : २८·८·६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. ९८८७९
शाखा

## ओसरली भरती

ओसरली भरती, ये परतीचा वारा
चढलेल्या होति ढिल्या सवयीच्या तारा
ढळला रे चंद्र, सख्या, वळला माघारा
हाय ! फिका होत जाय पाण्यावर पारा

शीड फिटे, वाट मिटे : कां धरूं सुकाणूं ?
वल्हवाया कां उगीच बळ बळेंच आणूं ?
जायचें जिथे तिथेच नेइल नेणारा
ओसरली भरती, ये परतीचा वारा

नाही मज घाई, पण वेग धरी होडी
जातांना एकाद्या शब्दांतच गोडी
जो दुवा दिलास त्यांत शीण मिटे सारा
ओसरली भरती, ये परतीचा वारा

पणजी : २८·८·६२

## स्मरते कधी

स्मरते कधी भरली नदी अन् गर्द झाडी काठची
पावसाळी चांदणें अन् सावली घनदाटशी
हिरवे दिवेसे काजवे, मरवा हवेचा तीक्ष्णसा
दूर कोण्या पाखराचा सूर जख्मी क्षीणसा
तो धुराने फासलेला झोपड्यांचा पुंजका
गोठलेलें तें धुकें—छे, कोंडलेला हुंदका

पणजी : ३०·८·६२

## तूं गेल्यावर

तूं गेल्यावर फिकें चांदणें, घरपरसूंही सुनें-सुकें
मुलें मांजरापरी मुकीं अन् दर दोघांच्या मधें धुकें

तूं गेल्यावर घरांतदेखिल पाउल माझें अडखळतें
आणि आटुनी हवा भवतिची श्वासास्तव मन तडफडतें

तूं गेल्यावर या वाटेने चिमणीदेखिल नच फिरके
कसें अचानक झालें नकळे सगळें जग परकें परकें

तूं गेल्यावर जळून पनगत लागे पिंपळ हाय गळूं
गळ्यांतलें मम झुरतें गाणें : वाटे मरतें हळूहळू

तूं गेल्यावर दो दिवसांस्तव जर ही माझी अशी स्थिती
खरीच माझ्याआधी गेलिस तर मग माझी कशी गती

पणजी : १·९·६२

# हे नसोत माड तिथे

हे नसोत माड तिथे, खचित चंद्र हा असेल
नसला जरि हा समुद्र, तो असाच गे हसेल
बघत त्यास तासतास मी तुलाच आठवितों
सुचतें तें त्या करवीं तुजकडेच पाठवितों

घरच्या व्यापांत तरी का असेल सवड तुला ?
थांबुनथांबून काय होइल तो हिरमुसला ?
चांदणें कुडींत तुझ्या अन् हृदयीं चंद्र तुझ्या
या माझ्या संसारीं चिरतापस तूं गिरिजा

तरिहि जरा खिडकींतुन हा माझा चंद्र पहा
लाभूं दे शीतलता दोन पळें या विरहा
या वेळीं असशिल पण श्रमुनि पार थकलेली
नातवंड धरुनि उरीं शांत गाढ निजलेली

माझा हा चंद्र तरी खिडकींतुन कुजबुजेल
गुज माझें स्वप्निं तुझ्या चित्र होउनी रुजेल
हसशिल तूं स्वप्नांतच आणि चंद्रही हसेल
आणि तुझें स्वप्न मला जागृतींतही दिसेल

५·१०·६२

# दिवस गार आले रे

नवल-निळ्या पाण्यावर धवलगर्द सवणारीं
तरणारीं संथपणें, चंटपणें फिरणारीं
म्हणति, "सख्या, नवसांचे दिवस गार आले रे
मधुरेचे प्यालेसे अधरांना भिडणारे
तरुंवरून झुरूमुरून ओघळतिल सोन-उन्हें
मोहरेल पानपान कुंकुमकण-मंजिरिने
फुटतिल गवतास नेत्र, वेलींना लक्ष कळे
विरही खगमिथुनांचे पानांतुन साद खुळे
सरण्याआधीच सांज जग खिरेल चांदण्यांत
घन विरेल मनसुरेल मधुर स्वप्नरागिण्यांत
दूरांतिल खोपटिशीं जाळाची दिसुनि धुनी
खुपतिल रे उगिच उरीं रुतलेल्या आठवणी
होइल आकाश निळें अन् तसेंच स्वच्छ तळें
आंगठी दिसेल तुला त्यांत तुझी त्याचमुळे
व्यथित तुझी विमल सखी राहिल सारीत वात
होइल रे विझुनि आग दिवसाहुनि मधुर रात."

पणजी : १४·१२·६२

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ...................
क्रमांक ........................ नों दि ...................

# जळणाऱ्या जळत रहा

जळणाऱ्या जळत रहा : जळतों सारेच अम्ही
जळण्याच्या लाख तऱ्हा : राख मात्र जास्त-कमी

जळणाऱ्या जळत रहा : ज्वालांचें भाग्य तुझें
ज्वालेविण जळती जे त्यांचें सर्वस्व खुजें

सौख्य खुजें, दुःख खुजें, धूरच मागे नि पुढे
वांझोट्या जळण्याने घ्यावें तें वळण तिढें

ज्वालांच्या पंखांनी गगनाला भिडत रहा
प्राणाच्या दीप्तींतुन क्षितिजाचें स्वप्न पहा

असल्या या जळण्याने जळ घनांत साकळतें
गवसलें न जें युगांत तें पळांत आकळतें

२४·४·६३

# गणगोत

माझें दार खुलें बघून घरिं जे आले घरासारखे
अन् माझी कविता सुखें परिसतां झाले जगा पारखे
गेले दूर...तरीहि ओल धरितो येथे तयांचा लळा
आहे त्याचमुळे जळाविणहि हा माझा मळा कोवळा
नाही कोणि सखी तरीहि नसतों केंव्हाच मी एकला
आता साथ नसून टीप धरितो तालांत माझा गळा

झाडें मोहरती, गुरेंहि दुभती, चित्रावती पाखरें
रंगांचें भरतें ढगीं उतटतें निःसंग माझ्या स्वरें

२५·४·६३

# नाही कांहीच आपुलें

नाही कांहीच आपुलें तरी स्नेहें द्यावेंघ्यावें
आणि तेवढ्यापुरतें तुझेंमाझेंही म्हणावें
सारें असेल नाटक पहाटेला मिटणारें
पण तेवढ्यापुरतें नाही काय तेंही खरें?
रात काढायाची आहे: कस लावावा कशाला?
घ्यावा निश्चित मनाने बाहु आलेला उशाला
क्षण येणारा सामोरा घेऊं करून चोखटा
काल-उद्यांचा विचार येथे करंटा ओखटा

४.५.६३

## समुद्रराग

पावसांत जागला समुद्रराग सावळा
लाट लाट दाटते भरून भाव कोवळा

काठ काठ ढासळे, पिसाट माड स्फुंदती
आंधळ्या ढगांतुनी प्रकाशबिंदु सांडती

हाक ये दुरून एक झाकळून टाकते
गाढ गूढ आठवांत मूक वेल वाकते

माखते चराचरीं अथांग गांग गारवा
आगळा जगास ये उदास रंग पारवा

धूसरे सरींत दूर, सूरसूर व्याकळे
भाव की अभाव हा करी सुगंध मोकळे !

कोण ही व्यथा अशी सुखास लाज आणते ?
सागरार्थ कोणत्या उसासुनी उधाणते ?

२०.७.६३

# हवा पावसाळी

हवा पावसाळी
जरा रात्र काळी
ढगांआडचा चंद्र थोडा फिका
दिवे दूर कांही
धुक्याच्या प्रवाहीं
जळीं पूल कोणी लुळा मोडका
कुठे दाट खोपी
उभे माड झोपीं
पथीं झावळांच्या खुळ्या सावळ्या
कुठे सर्द वारा
जरा गर्द खारा
जिवा स्पर्शुनी त्याहि भांबावल्या
कुणी बांग देतो
कुणी वेध घेतो
अकस्मात तेजाळती काजवे
सुखाच्या तळाशीं
किती दुःखराशी
उरीं कारणावीणही कालवे
नदी आज जागी
उदासी अभागी
अजूनी न ये नीज या सागरा

हवा पावसाळी
जरा रात्र काळी
हिची आगळी आज कांही तऱ्हा

२६·७·६३

## सूर सूर

खांद्यावर गलित सखी
वेल कशी झुकलेली
मांडीवर अन् गिटार
तार तार थकलेली

पेला करिं मदिरेचा
अर्धरिता थिजलेला
आणि कवे ! शिणलेला
गाल तुझा भिजलेला

माथ्यावर द्राक्षवेल
क्वचित कुठे सुकलेली
द्राक्षें पण जाग जाग
आग जणू पिकलेली

चांदण्यास आज पूर
घर उरलें दूर दूर
शब्दांविण गात्र गात्र
वस्तुमात्र सूर सूर

२६·७·६३

## शब्द मनांत करतो कीव

म्हणतों येथे भुई थोडी पाणी मात्र अपरंपार
तसेंच आपलें इथलें जिणें : सुख थोडें दुःख फार
पण भुई पाण्याशिवाय न्हातीधुती झाली नसती
सुखास तरी दुःखाशिवाय काय गोडी आली असती?
म्हणतों संसार नाटक नुसतें; पण तें नीट बघत नाही
नाटकांत काम करूनदेखील खरें नाटक जगत नाही
मरण तेवढें म्हणतों खरें; दिसतांच पण करतों पाठ
मात्र रडून जाणाऱ्याची व्यर्थ अडवून धरतों वाट
म्हणतों कुणीच आपलें नाही; छळतें पण एकटेपण
एकांताचा एकेक क्षण मण-मण घालतो घण

असली आपली ऐकून भाषा शब्द मनांत करतो कीव
म्हणत असतो, "भल्या माणसा, निदान आपलें तोंड शींव."

२७·७·६३

## प्रसन्न बुद्ध

उत्तररात्र ओलांडून खुळें चांदणें घरांत आलें
गाढ झोपेंत मूल मूल दवामधलें फूल झालें
आई त्यांची हिरवी वेल पानपान आळसलेली
स्वप्नपत्री खुडीत असतां मोतीचूर पावसांत न्हाली
सोनदिवीचे पाचहि डोळे जागून झाले मंद मंद
गार झोंबरा वारा आला घरांत ओतीत धुंद गंध
मीच तेवढा जागा झालों : गगनभर पांगली नीज
अकस्मात नागीण कशी प्राण चाटून गेली वीज
अंधारांतल्या पारिमिता संपून उजळ झाली शुद्ध
शिळ्यापाक्या सुखाखाली उपासपोटीं दिसला बुद्ध
खिडकीमधून उडत आलें, बोललें कोवळें पिंपळपान :
"पावस-पाण्यांत पिकली पुनव; चल लौकर वेचून आण"
वेडे पाय चालूं लागले तोच जुनी आठवण झाली
उंबरठ्याशीं कपाळभर दरदरून हूम आली
तसाच फिरून वारें कसा जागवलें मी सारें घर
त्याच्या संगें वेचली पुनव चूर होऊन रात्रभर
रोज चांदणें घरांत येतें फुलतो संसार पिंपळ कसा
कवडसासा अजून बुद्ध बसून आहे उघडून पसा

२९·७·६३

## शीड

वर्षें सरती, स्वप्नें मरती, आपण उरतों मागे
रितेपणाची गाळित रेती घड्याळ असतें जागें
वेडेंविद्रें येतें वारें हाडें गोठविणारें
व्यर्थ साचतें दुःखावाचुन डोळां पाणी खारें
कधी काळखी गळे पावली, तडफड करिती पानें
फांद्यांमधुनी वटवाघुळसें कण्हे आंधळें गाणें
वात लावुनी तिचे एकटक बघतों ढळते मोती
छाया बनुनी होती गोळा दुरावलेलीं गोतीं
समोर दिसती अभिलाषांचीं फुटकींविटकीं पात्रें
आणि स्वतःला शापुनि घेती अवघडलेलीं गात्रें
कधि कानावर येतें गर्जित जिवास जागवणारें
धूसर नजरेपुढे उजळतें कांही थरथरणारें
कापित पाणी रात्र चांदणी शीड रुप्याचें पातें
येतें, भिडतें—परी मोडक्या जिवास टाकुनि जातें !

३१·७·६३

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ... दि:
क्रमांक ... नोंद दि

## अभंग

रस्त्यांत कोणसा आंधळा गातो
दिशांत, पाण्यांत भगवा रंग
प्रकाशवेगांत क्षणांत त्याचा
आकाशाएवढा होतो अभंग
एकतारी भिजे अश्रूंच्या सरीं
जागच्या जागींच थिजते नदी
घाईत जाणारा वाटेचा कोणी
अस्वस्थ होऊन थांबतो मधी
भिकारी गणून केविलवाणा
दयेने टाकून बारीक नाणें
कानांत तुळशी घालून जातो
ध्यानांत घेतल्यावाचून गाणें

३·८·६३

# आंदणवेल

चांदणकाळीं आंदणवेळ
दल दल फुलते रंजनवेल
आनंदाला फुटून फांद्या
निळें पाखरू घेतें झेल

चांदणकाळीं सलतें सूख
धूप कसें दरवळतें दुःख
चंद्रमणीसा शब्द निथळुनी
डुले घेउनी छंद अचूक

चांदणकाळीं झुलतो पूल
थडगेंदेखिल बनतें फूल
शिळेशिळेवर स्वप्नकळेचें
रत्नोपम उमटे पाऊल

चांदणकाळीं आंदणवेळ
जग सगळें टिपऱ्यांचा खेळ
सृष्टीवरती करिते वृष्टी
स्वरपुष्पांची अमृतवेल

पणजी : ४·८·६३

## लाडकें श्वानसें

लाडकें श्वानसें दुःख माझें मुकें
फिरतां घोटाळे आगे नि मागे
लागतां झापड होऊन लाकूड
पाळत करीत बसतें जागें

असतां चौघांत सुखांच्या ओघांत
पडून राहतें मिटून डोळे
डोळस परी तें उरतां एकटा
टाकीत राहतें कटाक्ष ओले

स्मृतींच्या घळींत स्वप्नांचें चांदणें
दाटून जेधवा लावितें लळा
वेगांत धावून दूरांत जाऊन
पिसाट होऊन काढितें गळा

खोव्याची सावळी पडून लिहिल्या
ग्रंथाचीं चावून फाडितें पानें
विषण्ण बैसतां ओढून दावितें
कधी न पाहिलीं अटंग रानें

घरांत जेधवा घराच्या वेगळा
शब्दांत ओतितों निःशब्द कळा
पायांस खेटून जखमा चाटून
शामक शीतळ गाळितें जळा

त्याच्याचमुळे रे असून एकटा
तसा मी एकटा कधीच नाही
जाणीव नसतां जाणीवेपरतें
बोलून जातों हें असलें कांही!

पणजी : १५·८·६३

## मराठीच्या ओव्या

दूध आईचें आटतां तिच्या हाके धावलीस
माय होऊनियां मला वेळोवेळी पावलीस
उचलुनी ओटींपोटीं सुखें लाविलेंस उरा
पान्हा पोसणारा तुझा झाला अमृताचा झरा
तुझ्या ज्ञानियाने मला कटींखांदीं खेळविलें
प्रकाशाच्या आकाशांत उंच फेकून झेलिलें
आणि भोळ्या नामयाने तीर्थें आणिलीं अंगणीं
कडे घेउनी पंढरे गेली आषाढीला जनी
तेथे पुंडलिकामुखें तिने देवविला पाठ:
"होई पांगळ्या आईची दिव्य पुढाराची वाट."
तुका वाटेंत भेटला धुंद इंद्रायणीथडीं
मला खांदीं घेउनिया त्याने टाकियली उडी
दोन्ही हातीं आलीं तेव्हा त्याच्या अभंगांचीं पानें
पांग फेडावया तुझे, शब्द-शब्द झाला लेणें
तृप्त होउनी बोलसी, "माझ्या लाडक्या सोनारा
माझ्या बहिणीबाईच्या आता सावर संसारा."
तुझ्या अनुज्ञेप्रमाणें नवे घडवितों घाट
तुमच्या ग भेटीसाठी नवी रेखाटितों वाट

तुक्या-ज्ञान्याला छळिलें तेच पण देती शिव्या
त्यांचा विसर पडाया गातों अशा तुझ्या ओव्या

पणजी : १६·३·६४

# पैगाम

अंध झाल्या दिशा, धुंद धावे नदी
रापती भोवती गारदी-पारधी
माग काढावया नाग सर्सावले
श्वास रोधून ते रोखिती पाणदी

तर्र काळोख हा किर्र झाडीमधे
पावलापावला कूट यंत्रायुधें
प्रस्तरीं वस्तरे विस्तवाचे झरे
वाकणावाकणा वाकडें साकडें

दिव्य पैगाम जो घेउनी जन्मला
होउनी काकडा मस्तकीं पेटला
बाण जात्याच ज्या अंतरीं खोमला
त्यास विश्राम तो या जगीं कोठला?

एकला चाल तूं हाल झाले तरी
कूड ही जावया अग्निकाष्ठांवरी
यज्ञ आयुष्य हें, मृत्यु ही सांगता
का मिटे त्याविणें रात ही, ही दरी?

कैक गेले पुढे, हाक ते घालिती
भाक जी तूं दिली ती घटी राखिती
चाल तूं चाल तूं वेदवेदीकडे
संपतां वाट ही ऊर्ध्व आहे गती

पणजी : २१·३·६४

## तुझें रूप पाहतों

हात पांघरून आज सर्व साहतों
तुझें रूप पाहतों

एक-एक पाश तुटे
देहांतुन जीव सुटे
प्राणांतुन स्रोत फुटे : त्यांत नाहतों

मूक रूखसा बनून
सहज चाललों झडून
सम गणून वाव-ऊन अचल राहतों

दाहांतहि गंधवाह
भोगितों तुझा प्रवाह
ऋतुवर! तव स्पर्शलाह हृदयिं होय तों

पणजी : २४·३·६४

# गिमाचा कुसवा

कोरड पात्रांना गीम घालितो धिंगाणा
ठायीं ठायीं पोचे मात्र तांब्याविंदल्यांना
म्हणूं नका असें आज वाऱ्या लागे पिसें
पाल्यापाचोळ्यांत त्याच्या गार-खुळ्या ताना

जरा वर बघा : ढगां सोनियाच्या रेघा
खांदीं त्यांच्या काळाभोर मखमली मेणा
रामजन्मघडी : वाजे ताश्यावर छडी
कळवळे राणी : तिला जीवघेण्या वेणा

घ्या ग डोळां विजा, आंतबाहेरून भिजा
सरींच्या ग पाळण्यांत झुले पाण-राणा
कुठे जातां घरीं ? आता सरींवर सरी
गिमाचा कुसवा पुरा फळूं दे आपणा

मुंबई : ३०·४·६४

## चित्त पिपासित रे

संतत धार झरे
तरी हें चित्त पिपासित रे

गढलें अंबर जड जलदांनी
गरजे सागर मंद्रि उधाणीं
धरिलें वादळ वड-माडांनी
भरलें खूळ धरे
तरी हें चित्त पिपासित रे

अविरत वरसे वर ही वर्षा
प्रतिपर्णी ये प्राण प्रकर्षा
शिळांतुनि जळ उधळी हर्षा
स्थिरचर स्वरिं लहरे
तरी हें चित्त पिपासित रे

कोंभधुमारे फुटती खोडा
रित्या खळींतून धावे लोंढा
गहिवरुनी प्रति दगड नि धोंडा
कण कण सहज खिरे
तरी हें चित्त पिपासित रे

बनावनाची धूळ निमाली
निळी जहाली सकळ काजळी
जिवाजिवांतहि नवी नव्हाळी

ये तारुण्य जरे
तरी हें चित्त पिपासित रे

कां मनुजाचें चित्त कोडगें
वर्षैंतहि उपडेंच गाडगें
ठरुनी अंतीं माप नाडगें
क्रंदत मात्र उरे
सख्या हें चित्त पिपासित रे

पणजी : २४·६·६४

अनुक्रम ४००६८ वि: काव्य
क्रमांक ९६६० नोंद दि. २८।।५६

# कृतार्थ

आल्हाद-उत्साहाच्या धबधब्याची
कर्पूरगौर देवताच अशी तूं
रजतस्मिताचा चुरा उधळीत
स्वागतार्थ सामोरी आलीस दारांत
पुढे करीत जिवणीवरचें
डाळिंबीचें लालचुटूक टवटवीत फूल
मिरवीत अंगांत पिसावलेल्या
हिरव्यापिवळ्या पिसोळ्यांचा
रेषोत्कर्षक उन्हेरी झगा
आणि रुळवीत उभार उरोजांच्या मधोमध
उभट नाजूक झिगझिगणारा
कांचन-क्रूस

घेऊन गेलीस उल्हासाने
खानदान ऐश्वर्याच्या दिवाणखान्यांत
उधळीत नितळ उघड्या अंगांगांतून
तरतरीत आठ मुलांचें संतृप्त बाळसें
शरदांतल्या द्वादशीच्या चांदण्यासारखें
बसवून मला झुलत्या आरामखुर्चीत
विराजलीस पुढच्या नक्षीदार शिसवी स्टुलावर
व्हिन्सीच्या चित्रांतील नायिकेसारखी
भोवती घेऊन आपल्या वात्सल्याचा प्रफुल्ल पिसारा
ज्याच्यावर तुझेच आगळे कोवळे तोंडवळे
वेगवेगळ्या वयांतले

तुझे डोळे लागले होते माझ्यावर
सोनकिनारी चंद्रकोर-भिंगांतून
फुललेल्या शृंगारशाखेवर स्थिरावलेल्या
निळ्या पाखरांच्या युगुलासारखे :
अशीच बसली असेल का माग्दालेना
स्निग्ध, सोत्कंठ, खिस्ताच्या शेजारीं ?
परीसारख्या मुलीकरवीं
भरलीस काचेची गुलछडी
फेसाळ गव्हाळ्या मदिरेनें
मनांत आलें, ही शेलाटी पोर घ्यावी सून करून
पण म्हणालों, "ही तर इतक्यांत नवरी झाली."
तेव्हा तूंच बोललीस, "घेणार ना सून करून ?"

दाखवलेस घरांतले आल्बम
विणीत एकेका चित्रावर
स्मृतींची शुभ्र सुकुमार झालर
पाद्री दीराला सांगूं लागलीस
कॉलेजांतल्या एकेक गोष्टी
तीस वर्षांपूर्वीच्या, नुकत्याच घडल्यासारख्या
ज्या मी केव्हाच विसरलों होतों :
माझ्या खिस्तचित्राला मिळालेल्या बक्षिसाच्या
प्रोफेसरांना दिलेल्या चमकदार उत्तरांच्या
वर्गांतल्या वर्गांत रचलेल्या कवितांच्या
रेखाटलेल्या चित्रांच्या, मी लावलेल्या लोभाच्या

आणि पाश्चात्य संगीताच्या तासाला
मजकडून घडलेल्या गफलतींच्या
जुन्या आठवणींच्या त्या गर्द काळोख्या अरण्यांत
अकस्मात उघडलें सुरम्य सोज्ज्वळ ऊन
जादूच्या पंख्यासारखें
आणि मावळलेलें तारुण्य
एकदम बहरून आलें
माघांतली दुपार होऊन
म्हणालीस, "तेव्हासारखे गा पुन्हा एकदा
वर्षें तुम्हाला शिवलीं नाहीत."
असा गायलों ऊर भरून
की गळा स्रवला अमृत होऊन...

होतीस तशीच आहेस अजून
व्हर्जिन मेरी, पण सुखदुःखांची तड ओलांडलेली

कृतार्थ अशी पाहून तुला
काटाकाटा फुलला आहे
वाळवंटांतून हिंडला जीव
शहाळें पीत बसला आहे
डाळिंबीचें फूल होऊन
उन्हांत आता झुलतों आहें
हिरव्या-पिवळ्या पिसोळ्यांचा
थवा तेवढा बघतों आहें

पणजी : ११·८·६४

# माझी काया

माझी काया, माझी काया
एका ज्योतीची रे छाया
थोडें स्वप्न, थोडी आशा
थोडें आसूं, थोडी माया

छाया सावळीसावळी
साध्या बोलींही बावळी
पण गाऊं लागतांच
होते चांदण्याची तळी

ज्योत उघडिते गाभा
फाके आभाळींहि आभा
छाया अकस्मात होते
सत्यसुंदराची शोभा

तिच्या थिटेपणांतला
एवढाच मोठेपणा
किरणांत धुळीला रे
जसा सोन्याचा पाळणा

पणजी : २१·८·६४

## पहाट होतांच

पहाट होतांच ज्योती अशा
एकाएकी विझल्या कशा?
पाणी दिसतांच जहर होऊन
कशा एकदम पेटल्या तृषा?

लखलखणारीं शिखरें बघून
गोठले असे पाय कसे?
हात लागले तेथे कसे
कालियाचे काळे ठसे?

मंत्र ज्यांनी म्हटले होते
त्याच ज्वालांसारख्या जिभा
आज आपल्या दंशांमधून
प्रलय कां रे करती उभा?

जुळलीं मनें फाटूनफुटून
शिंगें रोखून घेती धिरी
बघून, कालची वैरीण रात्र
कितीतरी वाटते बरी

तेव्हा आम्ही एक होतों
नक्षत्रावर लक्ष होतें
आता आमचें सारें आभाळ
कुकडांचेंही भक्ष्य होतें

प्रकाशाने कालचा काळोख
कां रे असा दुणा व्हावा ?
हिरा जोडला त्याला कां रे
एकदम खडतर तडा जावा ?

सारा यज्ञ संपल्यानंतर
उरली फक्त राखच कशी ?
कुंकू भाळीं लागतांच कशी
आई झाली वेडीपिशी ?

पणजी : ३·१०·६४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र.
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नों. दिः ........
REFBK-0014814
REFBK-0014814

## घनवदन

करि गहन हृदयदोहन गे
घनवदन मदनमोहन गे

तो दूर सखे, मी धावा
तो सूर सखे, मी पावा
रति मी, तो रससाजण गे
घनवदन मदनमोहन गे

तो नटनायक स्वच्छंदी
मी अटकेतिल गृहबंदी
परि करि घर क्रीडांगण गे
घनवदन मदनमोहन गे

तो कदंब, मी कालिंदी
मी विषण्ण, तो आनंदी
परि चिरसुख दे आंदण गे
घनवदन मदनमोहन गे

जरि बन मी घनराईचे
मज भरते ये जाईचे
मग उधळी हरिचंदन गे
घनवदन मदनमोहन गे

मी सुम जरि कोमलदेही
तो त्यांतिल गंध विदेही
मरण क्षण संजीवन गे
घनवदन मदनमोहन गे

पणजी : १९६४

## साहित्यसमीक्षा

नरहर रघुनाथ फाटक

बा० सी० मर्ढेकर

गो० वि० करंदीकर

कुसुमावती देशपांडे

ना० गो० कालेलकर

ना० ग० जोशी

शरच्चंद्र मुक्तिबोध □ इंदिरा □ बा० सी० मर्ढेकर □ आरती प्रभू □ दिलीप पुरुषोत्तम चित्रे □ बा० भ० बोरकर □ अनिल □ पद्मा □ ना० घ० देशपांडे □ कांत □ म० म० देशपांडे

यांचे कवितासंग्रह

✲

प्राचीन गीतभांडार □ मऱ्हाटी लावणी

ही कवितासंकलने

मौज
प्रकाशन गृह